मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in | E mail - dainikyuvakaadhar@gmail.com | facebook : yuvakadhar

दैनिक तरुणांचा बुलंद आवाज मराठी

# युवक आधार

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले




● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे

■ वर्ष : ३ ■ अंक : ३२० ■ रविवार, ०२ ऑगस्ट २०२६ ■ किंमत : २ रु ■ पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514

# विरोध करण्याचा अधिकार आहे, पण गोंधळ घालण्याचा नाही"; आंदोलनावरून स्मृती इराणी यांनी सुनावलं

इंडिया टुडेला दिलेल्या मुलाखतीत स्मृती इराणी म्हणाल्या, "केंद्र सरकारने या मुद्द्यावर तातडीने कारवाई केली. संसदेने मंजूर केलेला कठोर पेपरफुटीविरोधी कायदा, तज्ज्ञांच्या कृती दलाची स्थापना आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोशल मीडियाद्वारे विद्यार्थ्यांशी केलेला थेट संवाद यामुळे गोष्टी आलबेल आहेत. या विविध उपाययोजनांवरून हे दिसून येते की सरकार तरुणांच्या समस्यांबाबत अत्यंत गंभीर आणि संवेदनशील आहे."

**तरुणांकडे एकाच दृष्टिकोनातून पाहणे चुकीचे!**

देशातील तरुण पिढीचा मोठा भाग भारतीय सैन्य, पोलीस आणि इतर सरकारी संस्थांमध्ये राष्ट्रसेवा करत आहे. त्यामुळे, केवळ वयाच्या आधारावर सर्व तरुणांना एकाच नजरेतून पाहणे आणि सरकारविरोधी ठरवणे पूर्णपणे चुकीचे ठरेल. देशात फूट पाडण्यासाठी वयाचा वापर साधन म्हणून करू नये, कारण देशभक्ती आणि लोकशाही संस्थांबद्दलचा आदर प्रत्येक पिढीसाठी सारखाच असतो."




**"जखमी पोलिसांच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष का?"**

आंदोलनादरम्यान झालेल्या पोलीस कारवाईबाबतही त्यांनी मत व्यक्त केले. "तुम्हाला तुमची मते व्यक्त करण्याचा, चर्चा करण्याचा आणि मतभेद व्यक्त करण्याचा प्रत्येक घटनात्मक अधिकार आहे, परंतु तुम्हाला गोंधळ घालण्याचा किंवा हिंसाचार निर्माण करण्याचा कोणताही अधिकार नाही. प्रसारमाध्यमांचा मोठा भाग केवळ आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवरच लक्ष केंद्रित करत होता. पण आंदोलनादरम्यान जखमी झालेल्या दिल्ली पोलीस आणि निमलष्करी दलाच्या जवानांच्या दुर्दशेकडे का दुर्लक्ष करत आहे. गुप्तचर अहवालांच्या नुसार, अशी भीती होती, वातावरण बिघडवण्याच्या उद्देशाने काही गुन्हेगारी प्रवृत्तीच्या घटकांनी या निष्पाप विद्यार्थी आंदोलनांमध्ये घुसखोरी केली आहे," असा दावा त्यांनी केला.

## स्लग-चांदवड टोलनाक्यावर लाखो रुपयांचे एमडी ड्रग्ज जप्त

मुंबईहून मालेगावच्या दिशेने अमली पदार्थांची तस्करी होत असल्याची गुप्त माहीत मालेगाव अप्पर पोलीस अधीक्षक यांना मिळताच त्यांचे पथक व चांदवड पोलिसांच्या पथकाने चांदवड च्या मंगरूळ टोलनाक्यावर सापळा रचून गाडीची कसून तपासणी केली असता त्यामध्ये बंदी असलेले 'एमडी ड्रग्ज' आढळून आले. पोलिसांनी तत्काळ कारवाई करत ड्रग्ज आणि वाहनासह तीन आरोपींना ताब्यात घेतले.

## रत्नागिरी- मुंबई गोवा महामार्गावर अंजनारी घाटात भीषण अपघात

रत्नागिरी- मुंबई गोवा महामार्गावर अंजनारी घाटात भीषण अपघात, पलटी झाल्यानंतर त्याने घेतला पेट. गोव्याहून मुंबईच्या दिशेने जात होता ट्रक, अपघातानंतर ट्रक जळून खाक. ट्रकने पेट घेतल्यानंतर ट्रक मधील चालक आणि क्लीनर दोघेही होरपळले, कोरफळलेल्या दोघांवरती रुग्णालयात उपचार सुरू. वाहतूक मात्र सुरळीत, अंजनारी घाटात मात्र बर्निंग ट्रकचा थरार.

## रत्नागिरीत सर्पदंशाने निधन झालेल्या कंत्राटी कर्मचाऱ्याच्या कुटुंबाला भाजपची ५ लाखांची मदत..

रत्नागिरी नगर परिषदेच्या उद्यान विभागातील कंत्राटी कर्मचारी काशीनाथ गोताड यांचं गोगटे जोगळेकर महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर साफसफाई करताना सर्पदंश होऊन दुर्दैवी निधन झालं. उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. या घटनेची दखल घेत भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या सूचनेनुसार,भाजप महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष वर्षा ढेकणे आणि शहराध्यक्ष दादा ढेकणे यांनी गोताड कुटुंबाची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले.

## पत्नीच्या अपघाती मृत्यूनंतर मिळालेल्या नुकसानभरपाईवर डल्ला

कायद्याचे रक्षण करण्याची जबाबदारी असलेल्या वकिलानेच आपल्या पक्षकाराचा विश्वासघात केल्याचे गंभीर प्रकरण बारामतीत न्यायालयाने उघड केले आहे. मोटार अपघातात पत्नी गमावलेल्या व्यक्तीला मिळालेल्या नुकसानभरपाईतून वकील फी म्हणून फक्त १ लाख काढणार असल्याचे सांगत प्रत्यक्षात स्वतःच्या खात्यावर १० लाख रुपये वळविणाऱ्या ॲड. बापू बाबुराव दिवेकर यांना बारामती न्यायालयाने एक वर्ष सक्तमजुरी आणि २५ हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली.

## सनातन धर्मावरील कथित वक्तव्यावरून नागपुरात भाजयुमोचे आंदोलना

सनातन धर्माचा विरोध केल्याचा आरोप करत खासदार पप्पू यादव, काँग्रेस नेते राहुल गांधी आणि इंडिया आघाडीच्या विरोधात भारतीय जनता युवा मोर्चाने नागपुरात आंदोलन छेडले आहे. भाजप शहराध्यक्ष दयाशंकर तिवारी यांच्या मार्गदर्शनाखाली आणि भाजयुमो शहराध्यक्ष सचिन करारे यांच्या नेतृत्वात बर्डीतील वेरायटी चौकात हे निषेध आंदोलन करणार आहे.भोंदू खरातला सात दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे.

## दूध भेसळ प्रकरणाच्या आरोपावरून माजी मंत्री दिलीप वळसे पाटील संतापले

दूध भेसळ प्रकरणावरून सध्या आंबेगाव तालुक्यात राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. अन्न आणि औषध प्रशासनाकडून (FDA) सुरू असलेल्या कारवाईच्या पार्श्वभूमीवर विरोधकांकडून होणाऱ्या आरोपांना माजी मंत्री आमदार आणि माजी मंत्री दिलीप वळसे पाटील यांनी चोख प्रत्युत्तर दिले आहे

## ऐरोलीत रिक्षा-टेम्पोच्या बॅटऱ्यांवर चोरट्यांचा डल्ला

ऐरोली परिसरात रिक्षा आणि टेम्पोच्या बॅटऱ्या चोरीला जाण्याची घटना समोर आलेय. ऐरोली सेक्टर-2 परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात बॅटरी चोरीचा प्रकार कैद झालाय. सीसीटीव्ही फुटेजमध्ये दोन व्यक्ती रिक्षातून उतरून रिक्षा आणि टेम्पोची बॅटरी चोरत असतानाचा कारनामा कैद झालाय. या घटनेमुळे रिक्षा व टेम्पोचालकांमध्ये आपल्या वाहनांच्या सुरक्षिततेबाबत चिंता वाढली असून याप्रकरणी रबाळे पोलीस ठाण्यात तक्रार करण्यात आली असून सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे संबंधित चोरट्यांचा शोध घेऊन कारवाई करण्याची मागणी वाहनचालकांकडून करण्यात येत आहे

## नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर इतिहास घडला पहिल्या मालवाहू 'इंडिगो कार्गो' विमानाचे यशस्वी लँडिंग

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या (NMIA) प्रवासात आज आणखी एक सुवर्ण अध्याय जोडला गेला आहे. विमानतळावर पहिल्यावहिल्या कार्गो (मालवाहू) उड्डाणाचे यशस्वी लँडिंग पार पडले. इंडिगो एअरलाइन्सचे 'IndiGo CarGo' (Airbus A321-211(P2F)) हे विमान बंगळुरू (BLR) येथून उड्डाण करून नवी मुंबई विमानतळाच्या धावपट्टीवर दाखल झाले. या ऐतिहासिक लँडिंगसह नवी मुंबई विमानतळावरून अधिकृत कार्गो सेवा सुरू झाली असून, इंडिगो ही या विमानतळावर कार्गो ऑपरेशन्स सुरू करणारी पहिली एअरलाइन ठरली आहे.

१८ वर्षे जुने असलेले हे इंडिगोचे विमान (VT-IKX, Flight 6E9031) नवी मुंबईत उतरल्यानंतर कार्गो टर्मिनलच्या दिशेने रवाना झाले. हेच विमान नवी मुंबई येथून पुढे शारजाह (संयुक्त अरब अमिराती) येथे आंतरराष्ट्रीय मालवाहतुकीसाठी रवाना होणार आहे. नवी मुंबई विमानतळावर ही सेवा सुरू झाल्यामुळे भारतीय लॉजिस्टिक्स आणि एव्हिएशन इन्फ्रास्ट्रक्चरला मोठी गती मिळणार असून, जागतिक पातळीवरील मालवाहतुकीसाठी कनेक्टिव्हिटी अधिक सुलभ होणार आहे. या यशस्वी लँडिंगनंतर येत्या काळात नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून अनेक आंतरराष्ट्रीय आणि देशांतर्गत मालवाहू उड्डाणे पूर्ण क्षमतेने सुरू होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

## कॉमनवेल्थ टेबल टेनिस स्पर्धेत पनवेलच्या स्वस्तिका घोषची सुवर्ण झेप

### भारतीय संघाकडून सुवर्णपदकाची कमाई; चांगू काना ठाकूर महाविद्यालयाच्या विद्यार्थिनीचा ऐतिहासिक पराक्रम

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी** जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, न्यू पनवेल (अधिकारप्रदत्त स्वायत्त) येथील पदव्युत्तर शिक्षण घेणारी आणि आंतरराष्ट्रीय टेबल टेनिसपटू कु. स्वस्तिका संदीप घोष हिने कॉमनवेल्थ टेबल टेनिस चॅम्पियनशिप–२०२६ मध्ये भारतीय संघाचे प्रतिनिधित्व करत सुवर्णपदक पटकावून देशासह पनवेल आणि महाराष्ट्राचे नाव अभिमानाने उंचावले आहे. स्वस्तिका घोष ही महाविद्यालयाच्या इंग्रजी विभागात पदव्युत्तर शिक्षण घेत असून शिक्षण आणि क्रीडा यांचा उत्कृष्ट समतोल साधत तिने आंतरराष्ट्रीय स्तरावर आपल्या खेळाची वेगळी ओळख निर्माण केली आहे. वेगवान, आक्रमक आणि तांत्रिकदृष्ट्या परिपूर्ण खेळाच्या जोरावर तिने अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये उल्लेखनीय यश संपादन केले आहे. त्याच यशस्वी वाटचालीचा आणखी एक सुवर्ण अध्याय तिने कॉमनवेल्थ स्पर्धेत लिहिला आहे. भारतीय संघासाठी सुवर्णपदक जिंकून स्वस्तिकाने देशाचा तिरंगा अभिमानाने



फडकवला असून तिच्या या देदिप्यमान कामगिरीचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. तिच्या यशामुळे पनवेलच्या क्रीडाक्षेत्रात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून युवा खेळाडूंना नवी प्रेरणा मिळाली आहे. स्वस्तिकाच्या या ऐतिहासिक यशाबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन लोकनेते माजी खासदार मा. रामशेठ ठाकूर, अध्यक्ष मा. अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन मा. वाय. टी. देशमुख, संस्थेचे कार्यकारी मंडळ सदस्य व आमदार मा. प्रशांत ठाकूर, माजी सभागृहनेते मा. परेश ठाकूर, सचिव डॉ. एस. टी. गडदे, महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील, क्रीडा संचालक डॉ. विनोद नाईक, इंग्रजी विभागप्रमुख डॉ. आर. व्ही. येवले, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी तिचे मनःपूर्वक अभिनंदन केले. यावेळी स्वस्तिका घोष हिने कॉमनवेल्थ स्पर्धेत सुवर्णपदक जिंकून महाविद्यालय, पनवेल आणि संपूर्ण देशाचा गौरव वाढविला आहे. तिचे हे यश आमच्या विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी असून तिच्या भावी कारकिर्दीसाठी आम्ही मनःपूर्वक शुभेच्छा देतो, अशा शब्दात प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांनी स्वस्तिका हिचे अभिनंदन केले आहे. स्वस्तिकाच्या या सुवर्ण कामगिरीमुळे महाविद्यालयात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विविध क्रीडा संस्था, नागरिक आणि क्रीडाप्रेमींकडून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## खांदेश्वर रेल्वे स्टेशनकडे जाणाऱ्या रस्त्यावर भीषण वाहतूक कोंडी कळंबोली वाहतूक पोलिसांच्या नियोजनावर नागरिकांचा संताप

**दैनिक युवक आधार**
**पनवेल**
**मच्छिंद्र पाटील तालुका | प्रतिनिधी**

खांदेश्वर रेल्वे स्टेशनकडे जाणाऱ्या खांदा कॉलनीतील सायन–पनवेल महामार्ग चौकात दररोज भीषण वाहतूक कोंडी होत असून नागरिक, नोकरदार आणि शाळकरी विद्यार्थ्यांचे पालक प्रचंड त्रस्त झाले आहेत. तर यावात कोंडीतून रुग्णवाहिका ही सुटल्या नाही आज झालेल्या वाहतूक कोंडीत रुग्णवाहिका उशिरापर्यंत अडकून राहिलेली दिसून आले. सकाळी व सायंकाळी तसोतास वाहनांच्या रांगा लागत असतानाही कळंबोली वाहतूक पोलिसांचे नियोजन पूर्णपणे अपयशी ठरत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी आवश्यक असलेले पोलीस कर्मचारी अनेकदा चौकात उपस्थित नसतात. परिणामी हजारो वाहनचालकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागतो. अनेक नोकरदारांना कार्यालयात उशीर होतो, तर विद्यार्थ्यांना शाळेत वेळेत पोहोचणे कठीण बनले आहे. नागरिकांचा आरोप आहे की, वाहतूक सुरळीत करण्याऐवजी काही ठिकाणी दंडात्मक कारवाईवर अधिक भर दिला जात असून प्रत्यक्ष वाहतूक नियंत्रणाकडे दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे कळंबोली वाहतूक पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. स्थानिक नागरिकांनी संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने या चौकाची पाहणी करून कायमस्वरूपी वाहतूक नियोजन करावे, गर्दीच्या वेळेत अतिरिक्त वाहतूक पोलिसांची नियुक्ती करावी आणि नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी करत आहे.





## सुशोभीकरणासाठी लावलेली झाडे झाली गायब

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल प्रतिनिधी**

पनवेल शहरातील नानासाहेब धर्माधिकारी उड्डाणपुलाखाली लावलेली सुशोभीकरणासाठी लावलेली झाडे गायब झाली आहेत. त्यामुळे याकडे कोणी लक्ष देणार आहे का असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित होत आहे. पनवेल शहरातील नानासाहेब धर्माधिकारी उड्डाणपुलाच्या खाली सुशोभीकरणाची झाडे लावण्यात आलेली आहेत. मात्र बऱ्याच ठिकाणची ही झाडे या ठिकाणाहून गायब झाली आहेत. झाडे नसल्याने त्या ठिकाणी केवळ माती दिसून येत आहे. या ठिकाणी माझी वसुंधराचे लोखंडी फलक देखील लावण्यात आले आहेत. मात्र या ठिकाणी



लावण्यात आलेली सुशोभीकरणाची झाडे दिसत नसल्याने ही झाडे कोणी काढली आणि त्याकडे कोण लक्ष देणार असा प्रश्न नागरिक विचारत आहेत. ही झाडे लावण्याचे कंत्राट ज्या कंत्राटदाराला दिले होते त्याच्यावर कारवाई होणार आहे की नाही असा प्रश्न येथील रहिवासी करत आहेत. याबाबत पनवेल पालिकेचे उपायुक्त नानासाहेब कामठे यांना विचारले असता सदरचा डिव्हायडर एमएमआरडीएच्या अंतर्गत येतो, त्यामुळे पालिकेकडून मेंटेन केला जात नाही. तसेच मागील वर्षी या ठिकाणी कोणतेही रोपे लावले नसल्याचे सांगितले.

## प्रदीप पंढरीनाथ जोशी यांचा जीवनगौरव पुरस्कार प्रदान करून सत्कार

**दैनिक युवक आधार मुंबई**
**प्रतिनिधी -गुरुनाथ तिरपणकर**

आयुर्विद्या प्रसारक मंडळ संचालित आयुर्वेद महाविद्यालय शिव मुंबई तर्फे शनिवार दिनांक 1/8/2026 रोजी आयोजित पंचकर्म कार्यशाळा निमित्त मुख्य प्रशासकीय अधिकारी म्हणून कार्यरत असलेले व संस्थेत 50 वर्ष सलग ,अखंडित ,अविरत,निस्वार्थ व निष्ठापूर्वक सेवा दिलेले श्री. प्रदीप पंढरीनाथ जोशी यांचा प्रदीर्घ



सेवेचा व सौ प्रिती जोशी यांनी त्याना खंबीर साथ दिल्याबद्दल आणि त्यांच्या सेवेचा सत्कार, संस्थेचे सरकार्यवाह माननीय डॉ. आशानंद सावंत सर यांच्या शुभहस्ते शाल ,श्रीफळ ,व जीवनगौरव पुरस्कार सन्मानचिन्ह देवून सन्मानित करण्यात आले याप्रसंगी संस्थेचे ,विश्वस्त व प्राध्यापक डॉ. विश्वजित पाताडे सर ,,नियामक मंडळ सदस्य डॉ. राजन पाटणकर सर प्राचार्य. डॉ. रविदास मोरे सर ,माजी प्राचार्य डॉ. कामत सर व डॉ. सातपुते सर उपप्राचार्य डॉ. पाथरीकर मॅडम व डॉ. शिला कोहाड , डॉ. पंकज ताथेड सर व सर्व शिक्षक ,शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी ,आंतरवाशी वैद्य मोठ्या संख्येनं उपस्थित होते व डॉ. हेमंत पराडकर सर यांनी श्री. प्रदीप पंढरीनाथ जोशी यांच्या ५०वर्षीय सेवेचा ,सामाजिक ,संघटनात्मक ,व पत्रकारिता कार्याचा परिचय करून दिला व त्यानंतर श्री. प्रदीप जोशी यांनी या सत्कार विषयी आपले मनोगत व्यक्त केले व वैद्य पंकज ताथेड सर यांनी सर्वांचे आभार मानले.

## पनवेल शहर पोलिसांची मोठी कारवाई; बनावट कागदपत्रांच्या आधारे २.२९ कोटींची जमीन फसवणूक करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, :** पनवेल शहर पोलिसांनी बनावट कागदपत्रांच्या आधारे जमीन विक्री करून तब्बल २ कोटी २९ लाख ५० हजार रुपयांची फसवणूक करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश केला असून, या प्रकरणात पाच आरोपींना अटक करण्यात आली आहे.

पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ११३/२०२६ अंतर्गत भारतीय न्याय संहिता २०२३ मधील विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. करंजाडे येथील सर्व्हे क्रमांक ८१/२ मधील ४७ गुंठे जमीन मूळ मालक नाथन एलियाहू चिंचोलकर आणि शालोम (सलीम) एलियाहू चिंचोलकर यांच्या नावावर होती. दोघांचेही निधन झाल्यानंतर त्यांचे वारस इस्रायल आणि अमेरिकेत वास्तव्यास आहेत.

या परिस्थितीचा गैरफायदा घेत मुख्य आरोपी सूरज वासुदेव शिंदे याने आपल्या वडिलांना बनावट नाथन चिंचोलकर आणि पत्नीच्या भावाला बनावट शालोम चिंचोलकर बनवून त्यांच्या नावाने खोटी ओळखपत्रे तयार केली. त्यानंतर करंजाडे येथील जमीन पनवेल येथील फिर्यादी प्रशांत प्रभाकर पाटेकर आणि त्यांचा मुलगा श्रेयस पाटेकर यांना विकून त्यांच्याकडून २ कोटी २९ लाख ५० हजार रुपये उकळण्यात आले.

गुन्हा दाखल झाल्यानंतर आरोपी सूरज शिंदे पत्नी, दोन मुली, वडील आणि अन्य नातेवाईकांसह विविध राज्यांत लपून राहत होता. तो महाराष्ट्रासह मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, दिल्ली, उत्तराखंड, राजस्थान, गुजरात आणि गोवा येथे सतत ठिकाणे बदलत होता. त्यामुळे त्याचा शोध घेणे पोलिसांसाठी मोठे आव्हान ठरत होते.

पोलीस उपायुक्त रश्मी नांदेडकर, सहाय्यक पोलीस आयुक्त भाऊसाहेब ढोले आणि वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळा कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन पोवार आणि त्यांच्या पथकाने तांत्रिक माहिती व गुप्त माहितीच्या आधारे गोव्यातील थिवी येथे सापळा रचून सूरज शिंदे (वय ३६), सतीश शिंदे (वय ४१) आणि तेजस सुवे (वय २६) यांना ताब्यात घेतले.

चौकशीत आणखी दोन आरोपी वासुदेव नामदेव शिंदे (वय ५६) आणि मनीष मोरे (वय ४४) यांचा सहभाग समोर आला. मनीष मोरे हा गोव्यातील अन्य एका गुन्ह्यात तुरुंगात असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर सर्व आरोपींना अटक करण्यात आली.

आरोपींच्या ताब्यातून मूळ जमीनमालक नाथन चिंचोलकर यांच्या नावाने बनविण्यात आलेले बनावट पॅनकार्ड आणि आधारकार्ड जप्त करण्यात आले आहेत. तसेच सूरज शिंदे आणि तेजस सुवे यांच्याविरोधात यापूर्वीही उरण पोलीस ठाण्यात फसवणुकीचे गुन्हे दाखल असल्याची माहिती समोर आली आहे.

या प्रकरणात आणखी काही आरोपींचा सहभाग असण्याची शक्यता असून, पनवेल शहर पोलीस पुढील तपास करत आहेत.

## खारघरमध्ये १८ अनधिकृत बांधकामे जमीनदोस्त





**दैनिक युवक आधार**

**पनवेल :** खारघर नोडमधील वाहतूक कोंडी आणि अनधिकृत अतिक्रमणांबाबत नागरिकांकडून प्राप्त झालेल्या तक्रारींची गंभीर दखल घेत सिडको महामंडळाने मोठी निष्कासन मोहीम राबविली. या मोहिमेत सेक्टर ४० आणि सेक्टर ३७ परिसरातील एकूण १८ अनधिकृत बांधकामांवर बुलडोझर चालवून ती हटविण्यात आली.

सिडकोच्या नियंत्रक, अनधिकृत बांधकामे (नवी मुंबई) विभागामार्फत सेक्टर ४० येथील बागेश्री सोसायटीसमोरील तसेच नाल्यालगत उभारण्यात आलेल्या अतिक्रमणांवर कारवाई करण्यात आली. या ठिकाणी वाहतुकीस अडथळा ठरत असलेले ७स्टॉल्स, १ सर्व्हिस सेंटर आणि १ गॅरेज शेड निष्कासित करण्यात आले.

याच मोहिमेदरम्यान खारघर सेक्टर ३७ मधील भूखंड क्र. NA-1 वर विनापरवानगी सुरू असलेली १ नर्सरी, ५ गॅरेज, २ फर्निचर दुकाने आणि १ ढाबा अशी एकूण ९ अनधिकृत बांधकामेही हटविण्यात आली. या कारवाईत नियंत्रक,

अनधिकृत बांधकामे (नवी मुंबई) विभागाचे अधिकारी व कर्मचारी, स्थानिक पोलीस, सिडको पोलीस पथक, सिडकोचे सुरक्षा रक्षक तसेच महाराष्ट्र सुरक्षा बलाच्या जवानांनी सहभाग घेतला. भविष्यातही अनधिकृत बांधकामांविरोधातील अशा कारवाया सुरू राहणार असल्याचा इशारा सिडको प्रशासनाने दिला आहे.

निष्कासन मोहीम

सिडकोच्या माहितीनुसार, संबंधित सर्व बांधकामे महामंडळाच्या प्रचलित नियमावली व धोरणांचे उल्लंघन करून तसेच कोणतीही अधिकृत परवानगी न घेता उभारण्यात आली होती. मुख्य दक्षता अधिकाऱ्यांच्या निर्देशानुसार मुख्य नियंत्रक प्रशांत भांगरे यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल नोडचे नियंत्रक (अनधिकृत बांधकामे) श्रीकांत पावसकर यांच्या नेतृत्वाखाली ही मोहीम राबविण्यात आली.

## शिवगिरी सेवा संस्थानचा गुरु पौर्णिमा उत्सव उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल प्रतिनिधी**

नवीन पनवेल येथील कालिका माता मंदिर सभागृहात पनवेल सुकापूर येथील देवद स्थित श्री शिवगिरी सेवा संस्थानच्या वतीने गुरुपौर्णिमा उत्सव अत्यंत धार्मिक वातावरणात आणि शिस्तबद्ध पद्धतीने साजरा करण्यात आला. आध्यात्मिक, सामाजिक, तथा क्रीडा क्षेत्रात कार्यरत असलेल्या या संस्थेच्या पनवेल, मुंबई, सातारा तसेच रत्नागिरी भागातील साधकांनी एकत्रितरित्या प्रसाद खोत, मिलिंद पांचाळ, शिवानंद प्रभू, बाळकृष्ण धामापूरकर, सुभाष खोत, आप्पाजी तोंडवळकर, राजू खोत, उदय सावंत, शितल खोत यांच्या मार्गदर्शनाखाली बुधवार 29 जुलै रोजी सकाळी 11ते 6 या वेळेत साजरा केला.



या कार्यक्रमाचे पौरोहित्य पनवेलचे दिगंबर पांगारकर गुरुजी आणि प्रसाद पाध्ये यांनी केले.

याप्रसंगी ब्रम्हलीन श्री १००८श्री महंत शिवगिरी महाराज, मूळपीठ नीलपर्वत, त्र्यंबकेश्वर आणि त्यांचे शिष्य तसेच श्री शिवगिरी सेवा संस्थानचे संस्थापक अध्यक्ष दिवगंत दिलीप खोत उर्फ दादा महाराज यांच्या पादुकांचे षोडशोपचारे पूजन केले. या वर्षी प्रथमच प्रसिद्ध नारदीय कीर्तनकार ह.भ.प.चंद्रशेखर बुवा अभ्यंकर यांचे मार्गदर्शनपर कीर्तन आयोजित करण्यात आले होते. विशेष म्हणजे चंद्रशेखर अभ्यंकर हे "सूर्य नमस्कार" शिबिराचे आयोजन त्याची पत्नी आणि मुलगा यांचे सहकार्याने विरार येथे करीत असतात. त्यात सुमारे ५००० सभासद एकाचवेळी सहभागी होतात. ते सेन्सॉर बोर्डात सदस्य म्हणून काही काळ कार्यरत होते. त्यांचे नारदीय कीर्तनाला पखवाज साथ ओवळा येथील साईनाथ घरत आणि हार्मोनियम साथ खांदेश्वर येथील कीर्तनकार पुरुषोत्तम काजेकरबुवा यांनी दिली.

## जासई विद्यालयात लोकमान्य टिळक पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती उत्साहात साजरी.

**दैनिक युवक आधार**
**उरण तालुका प्रतिनिधी / सागर घरत**

श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि.बा. पाटील जूनिअर कॉलेज, जासई विद्यालयात दिनांक १ ऑगस्ट २०२६ रोजी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी तसेच लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त संयुक्त अभिवादन कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते लोकमान्य टिळक व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमांचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी दोन्ही महापुरुषांच्या जीवनकार्यावर आधारित मनोगते व्यक्त केली. सौ वर्तक डी आर मॅडम यांनी शिक्षक मनोगतात लोकमान्य टिळकांनी स्वातंत्र्यलढ्यात दिलेले योगदान, शिक्षणाविषयीचे विचार तसेच लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी साहित्य, लोककला आणि समाजप्रबोधनाच्या माध्यमातून केलेल्या कार्याची माहिती विद्यार्थ्यांना दिली. या प्रसंगी पाचवी अ, सहावी अ तसेच नववी अ च्या विद्यार्थ्यांनी प्रेरणादायी भाषणे सादर करून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाच्या अध्यक्षा सौ मुकादम मॅडम यांनी आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांना राष्ट्रप्रेम, सामाजिक समता, शिक्षणाचे महत्त्व आणि समाजसेवेची प्रेरणा मिळाल या कार्यक्रमास विद्यालयाचे प्रभारी मुख्याध्यापक कुटे सर , पर्यवेक्षिका सौ मुकादम मॅडम, गुरुकुल प्रमुख श्री भोईर




सर ज्येष्ठ शिक्षक ठाकरे सर , ज्येष्ठ शिक्षिका सौ पाटील एस एस मॅडम , सौ जितेकर मॅडम , सौ ठाकूर एस ए मॅडम, सौ वर्तक डी आर मॅडम , सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन नववी अ मधील सान्वी घरत या विद्यार्थिनीने केले. हा कार्यक्रम नववी अ च्या वर्गशिक्षिका सौ मोकाशी मॅडम आणि विद्यार्थिनींनी आनंददायी व प्रेरणादायी वातावरणात संपन्न केला.

## दिलीप गावित ची राष्ट्रकुल स्पर्धेत पॅरा अथलेटिक्स मध्ये सुवर्णभरारी सुरगाण्याची शान, सुवर्णपदकाचा सन्मान.

**दैनिक युवक आधार**
**राजेंद्र टोपले, सुरगाणा**

स्कॉटलंडमधील ग्लासगो येथे सुरू असलेल्या राष्ट्रकुल स्पर्धेत पॅरा अथलेंटिक्समधील पुरुषांच्या १०० मी. टी ४७ प्रकारांत सुरगाणा तालुक्यातील तोरणडोंगरी या छोट्याशा गावचा दिलीप महादू गावित याने १०: ७१ सेकंदाचा विक्रमी प्रवास करत सुवर्णपदकावर आपले नाव कोरले आहे. सुवर्ण पदक जिंकून केवळ विक्रमच नाही तर आपल्या तालुक्याचे, गावाचे नाव उंचावत संपूर्ण देशाला एक प्रेरणा दिली आहे.

** थोडक्यात जीवनप्रवास**

दिलीप महादू गावित , तोरणडोंगरी ता सुरगाणा जि. नाशिक या गावामध्ये महादू गावित व मोहनाबाई गावीत या सर्वसामान्य आदिवासी दांपत्याच्या पोटी जन्म घेतलेला दिलीप सन 2009 साली जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तोरणडोंगरी ता. सुरगाणा जि.नाशिक या शाळेमध्ये दाखल झाला.

शालेय जीवनामध्ये विविध सहशालेय उपक्रमांमध्ये सहभागी होत असे. त्या शाळेमधील शिक्षकांनी त्याला लहानपणापासून अभ्यास, खेळ, संगीत, सहशालेय उपक्रम या सर्व प्रकारामध्ये गोडी लावली. त्यावेळी तो शाळेमध्ये खो -खो, कब्बड्डी, धावणे या मध्ये आवडीने सहभागी होत असे.

शाळेमध्ये असताना तत्कालीन मुख्याध्यापक भास्कर भुसारे पदवीधर शिक्षक केशव महाले क्रीडा शिक्षक मधुकर राऊत,सहशिक्षक गणेश पाडवी,यशवंत भोये, लक्ष्मण पवार या शिक्षकांनी त्याला सन 2009 ते 2016 या कालावधीत जिल्हा परिषद नाशिक अंतर्गत घेण्यात येणाऱ्या जिल्हा परिषद अध्यक्ष चषक स्पर्धेत इयत्ता चौथी पासून त्याला खो-खो, कबड्डी, रनिंग या स्पर्धांमध्ये सहभागी होण्यासाठीची प्रेरणा दिली. त्याच्याकडून सराव करून घेतला व त्याला प्रत्यक्ष त्या स्पर्धेमध्ये सहभागी करून घेऊन केंद्रस्तर, बीटस्तर,तालुकास्तर व जिल्हा स्तरापर्यंत खो-खो त्याच पद्धतीने धावणे सन 2013/14 व 2015/16 या वर्षी नाशिक जिल्हा परिषद अध्यक्ष चषक स्पर्धा प्रकारामध्ये प्रथम क्रमांक तसेच प्राविण्य मिळवण्यात त्याला मार्गदर्शन केले.




खऱ्या अर्थाने त्याचा पाया भक्कम करून घेण्याचे काम या जिल्हा परिषद शाळेमध्ये करण्यात आले. शाळेमधील शिक्षक मधुकर राऊत सर यांनी दररोज शाळेमध्ये असताना त्याचप्रमाणे सकाळी त्याच्याकडून रनिंग चा सराव करून घेतला आणि अशा पद्धतीने त्याला या धावणे क्रीडा प्रकारांमध्ये गोडी निर्माण झाली.

लहानपणीच उजवा हात गमवावा लागला असला तरी दिलीप ने कधीही त्याविषयी तक्रार केली नाही. तो आपले कौशल्य दाखवत विविध क्रीडा प्रकारांमध्ये सहभागी होऊन त्यामध्ये प्रावीण्य मिळवत असे. जिल्हास्तरापर्यंत त्यांनी झेप घेतली. त्यामुळे जिल्हा परिषद नाशिक अध्यक्ष चषक स्पर्धा या स्पर्धेचा निश्चितच त्याला त्याचा पाया भक्कम करण्यासाठी,त्याच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी त्याला उंच स्वप्न बघण्यासाठी या स्पर्धेने प्रेरणा दिली आणि या स्पर्धेतूनच आज तो जागतिक पातळीवरील धावपटू म्हणून प्रसिद्ध झालेला आहे. जागतिक स्तरावरील विविध स्पर्धा पार पाडल्यानंतर त्यात यशस्वी झेप घेतल्यानंतर दिलीप आपल्या मूळ गावी आल्यानंतर शाळेला आवर्जून भेट देत असे विद्यार्थ्यांशी, शिक्षकांशी संवाद साधत असे त्यावेळी सुद्धा त्या शाळेतील मुख्याध्यापक दिगंबर चौधरी शिक्षक पंडित गायवन,मनोहर भोये, रामदास भोये,पुंडलिक चौधरी, श्रीकांत गवळी, मधुकर राऊत, गणेश पाडवी त्याला मार्गदर्शन करत असत. प्रेरणा देत असत.

दिलीप इयत्ता 1ली ते 7 वी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तोरणडोंगरी पर्यंत शिक्षण घेतलेला दिलीप गावित आज कॉमनवेल्थ क्रीडा स्पर्धा 2026 स्कॉटलंड या ठिकाणी पुरुष 100 मीटर त 47 स्पर्धेत सुवर्णपदक मिळवून यश संपादन केले आहे. त्याच्या या यशाबद्दल तोरणडोंगरी गावचे मा.सरपंच रघुनाथ भुसारे ,उपसरपंच देविदास जाधव ग्रामपंचायत सदस्य,पेसा कमिटी अध्यक्ष आनंदा गावित व सदस्य, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष संतोष भुसारे,सर्व ग्रामस्थ त्याचप्रमाणे शाळेतील सर्व शिक्षक, विद्यार्थीबरोबरच संपूर्ण तालुक्यातुन अभिनंदन केले जात आहे.

## प्रशासकीय गोंधळात विद्यार्थ्यांचा जीव धोक्यात ! पनवेलमधील 51 शाळांचे हस्तांतरण रखडले

**दैनिक युवक आधार**

**पनवेल** : पनवेल महानगरपालिकेची स्थापना होऊन तब्बल 10 वर्षे पूर्ण झाली तरीही स्थानिक विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भविष्य आणि सुरक्षा अद्यापही अंधारातच आहे. रायगड जिल्हा परिषदेच्या अखत्यारीत असलेल्या 51 शाळा पनवेल महानगरपालिकेकडे हस्तांतरित करण्याचा प्रश्न गेल्या अनेक वर्षांपासून कागदावरच रेंगाळत पडला आहे. या प्रशासकीय हलगर्जीपणामुळे धोकादायक इमारतींमध्ये बसून शिक्षण घेण्याची वेळ चिमुकल्या विद्यार्थ्यांवर आली आहे शाळांच्या हस्तांतरणावरून जिल्हा परिषद आणि पनवेल महापालिका प्रशासनामध्ये एकमेकांवर जबाबदारी ढकलण्याचा प्रकार सुरू आहे. हस्तांतरणाची प्रक्रिया प्रलंबित असल्याचे कारण पुढे करत जिल्हा परिषद या शाळांच्या डागडुजी आणि दुरुस्तीच्या कामांकडे पूर्णपणे दुर्लक्ष करत आहे. तर शाळा अद्याप अधिकृतपणे ताब्यात आल्या नसल्याने पनवेल महानगरपालिका या शाळांच्या विकासाची किंवा सुरक्षेची जबाबदारी स्वीकारण्यास तयार नाही.। दोन्ही प्रशासनांच्या वादात मात्र शाळांमधील निरागस विद्यार्थी आणि अंगणवाडीतील चिमुकले भरडले जात आहेत. वस्था अत्यंत दयनीय झाली आहे. पावसाळ्यात परिसरातील अनेक शाळांच्या इमारतींची छतावरील पत्रे उडाल्याने वर्गात पाणी साचत आहे. जीर्ण झालेल्या भिंतींना मोठे तडे गेले असून त्या कधीही कोसळण्याची भीती व्यक्त होत आहे. अनेक वर्गखोल्यांमध्ये विजेची सोय नसल्याने विद्यार्थ्यांना अंधारातच बसावे लागत आहे. अशा अत्यंत जीवघेण्या परिस्थितीत चिमुकल्यांना शाळेत पाठवावे लागत असल्याने पालकांमध्ये प्रशासनाविरोधात प्रचंड संतापाची लाट पसरली आहे.थांबवून प्रशासनाने तातडीने या 51 शाळांच्या विद्यार्थ्यांच्या जिवाशी खेळणारा हा प्रकार हस्तांतरणाचा प्रश्न मार्गी लावावा आंणि शाळांच्या इमारतींची दुरुस्ती करावी, अशी जोरदार मागणी पालक आणि स्थानिक नागरिकांकडून केली जात आहे.'

दैनिक युवक आधार
हे पत्रक मालक, प्रकाशक: भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धी प्रिंटर्स, मंगल नगर, मलकापूर, पिन ४४३१०१, जि. बुलढाणा येथे छापून दैनिक प्रकाशित केले आहे. 'दैनिक युवक आधार' मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी, ग्रामपंचायत जवळ, मु.पो. आदई, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे.संपादक: भारती संतोष आमले.

Daily Yuvak Aadhar
Printed by Karansingh Prathadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, Mangal Nagar, Malkapur PIN 443101, Dist. Buldhana.Published at Head Office: Daily Yuvak Adhar, Indraprasth Society, Wing Flat No. 203-202, Survey No. 28/1/3, Panvel, Raigad, Adai Panvel Dist. Raigad.Editor: Bharti Santosh Amle.

## ऐरोली-कटई उन्नत मार्ग प्रकल्पग्रस्त शेतकरी व जमीनधारकांना योग्य मोबदला देण्याची मागणी

**दैनिक युवक आधार कल्याण**
**रमेश राऊत ग्रामीण प्रतिनिधी**

दि.१, दिवा (ठाणे) : ऐरोली-कटई उन्नत मार्ग (Airoli-Katai Elevated Road Project) प्रकल्पासाठी संपादित करण्यात येणाऱ्या जमिनींच्या मोबदल्याबाबत प्रकल्पग्रस्त शेतकरी व जमीनधारकांना



न्याय मिळावा, अशी मागणी ठाणे महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक २९च्या नगरसेविका वेदिका साहिल पाटील यांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, ऐरोली काटई उन्नत मार्ग बाधित परिसरातील शेतकरी व जमीनधारकांनी सध्याच्या मोबदल्याबाबत नाराजी व्यक्त केली असून, यापूर्वी बुलेट ट्रेन प्रकल्पासाठी ज्या दराने मोबदला देण्यात आला होता, त्याच धर्तीवर ऐरोली-कटई प्रकल्पग्रस्तांनाही न्याय्य मोबदला मिळावा.

तसेच, एकूण मोबदल्यात २५ टक्के वाढीव (प्रोत्साहनात्मक) मोबदला मंजूर करावा आणि Multiplier Factor 2 लागू करून शेतकरी व जमीनधारकांना योग्य भरपाई द्यावी, अशीही मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

प्रकल्पामुळे स्थानिक शेतकरी व भूमिपुत्रांच्या उपजीविकेवर परिणाम होणार असल्याने शासनाने या मागण्यांचा गांभीर्याने विचार करून प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळवून द्यावा, अशी अपेक्षा नगरसेविका वेदिका साहिल पाटील यांनी व्यक्त केली आहे.

## जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत खासदार राजेंद्र जैन यांनी मांडल्या विकासकामांबाबत महत्त्वपूर्ण सूचना

**दैनिक युवक आधार गोंदिया**
**सचिन बन्सोड जिल्हा प्रतिनिधी**

गोंदिया जिल्हाधिकारी कार्यालय येथे जिल्ह्याचे पालकमंत्री माननीय श्री इंद्रनील नाईक यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या गोंदिया जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत खासदार श्री राजेंद्र जैन यांनी जिल्ह्याच्या विकासाशी संबंधित विविध महत्त्वपूर्ण विषय उपस्थित करत प्रशासनाचे लक्ष वेधले.

यावेळी गोंदिया (कुडवा) येथे खासदार श्री प्रफुल पटेलजी यांच्या प्रयत्नाने मंजूर झालेल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या (मेडिकल कॉलेज) निर्माणाधीन कामाची सद्यस्थिती काय ? कामातील प्रगती व उर्वरित कामे गुणवत्तापूर्ण व दर्जेदार करून तातडीने पूर्ण करण्याबाबतही त्यांनी आढावा घेतला. भूमिगत गटार (Underground Drainage) योजनेमुळे शहरातील अनेक रस्त्यांची झालेली दुरवस्था लक्षात घेऊन संबंधित विभागाने तातडीने रस्त्यांची दुरुस्ती करून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी त्यांनी केली.

याशिवाय गोंदिया शहरासाठी प्रलंबित ऑडिटोरियमच्या अतिरिक्त निधी मंजूर असून तो तातडीने निकाली काढून कामाला गती देण्याची आवश्यकता आहे. तसेच भीमनगर–कुंभारेनगर रेल्वे क्रॉसिंग येथे प्रस्तावित अंडरपासऐवजी नागरिकांच्या सुरक्षिततेचा व भविष्यातील वाहतूक गरजांचा विचार करून उड्डाणपूल उभारण्यात यावा तसेच परमपूज्य डॉ बाबासाहेब आंबेडकर पवित्र अस्थी भीमघाट, गोंदिया, श्रीकृष्ण गौरक्षण, गौशाला परिसर पांजरापोल, गडमाता डुडुमाई देवस्थान, झालुटोला व कोरणी घाट यासह अन्य तीर्थक्षेत्रांच्या विकासासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून विकासकामांना गती देण्याची मागणीही त्यांनी बैठकीत केली.



# जिल्हा परिषद शाळा टिकल्या तरच ग्रामीण शिक्षणाचे भविष्य सुरक्षित; पटसंख्येच्या अयोग्य स्पर्धेवर अंकुश ठेवण्याची मागणी

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी - महेश पेन्दोर**

ग्रामीण भागातील सर्वसामान्य, शेतकरी आणि कष्टकरी कुटुंबातील मुलांसाठी जिल्हा परिषद शाळा या आजही दर्जेदार, मोफत आणि सुरक्षित शिक्षणाचा मुख्य आधार आहेत. शासन स्तरावरून मिळणारी मोफत पाठ्यपुस्तके, गणवेश, पोषण आहार आणि विविध योजनांमुळे या शाळांनी ग्रामीण भागात शिक्षणाची पायाभरणी केली आहे.




परंतु अलीकडच्या काळात काही शैक्षणिक संस्थांकडून पटसंख्या वाढवण्यासाठी सुरू असलेल्या अनधिकृत स्पर्धेमुळे शैक्षणिक वातावरणावर विपरीत परिणाम होत आहे. पालकांना आकर्षित करण्यासाठी असुरक्षित वाहतूक सेवा आणि विविध प्रलोभने दिली जात असल्याच्या चर्चा आहेत. यामुळे विद्यार्थ्यांची, विशेषतः अल्पवयीन मुलींची सुरक्षितता धोक्यात येत आहे.

खाजगी वाहनांतून मर्यादेपेक्षा जास्त विद्यार्थ्यांची वाहतूक करताना महिला कर्मचारी किंवा सुरक्षेचे नियम पाळले जातात का, याची तपासणी होणे गरजेचे आहे. तसेच ज्या शाळांमध्ये एकही महिला शिक्षिका नाही, तिथे विद्यार्थिनींच्या सुरक्षेचा आणि आरोग्याचा प्रश्न निर्माण होत आहे. पटसंख्या वाढवण्याच्या या स्पर्धेत मुलांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाकडे दुर्लक्ष होत असून शाळांमधील वातावरण बिघडत असल्याची चिंता पालक व्यक्त करत आहेत.

जिल्हा परिषद शाळांमधील पटसंख्या घटल्यास त्याचा थेट परिणाम शिक्षकांची पदे, शाळेचा निधी आणि मिळणाऱ्या सवलतींवर होतो. त्यामुळे ग्रामीण भागातील मोफत शिक्षण व्यवस्थाच कमकुवत होण्याचा धोका आहे. जिल्हा परिषद शाळा या केवळ शाळा नसून ग्रामीण समाजाची भावी पिढी घडवणारे केंद्र आहेत.

त्यामुळे शिक्षण विभाग, पोलीस आणि RTO प्रशासनाने शाळा प्रवेश प्रक्रियेतील अनियमितता आणि विद्यार्थी वाहतुकीची त्वरित तपासणी करावी. तसेच ज्या शाळांमध्ये महिला शिक्षिका नाहीत तिथे तातडीने नियुक्ती करून जिल्हा परिषद शाळा अधिक सक्षम कराव्यात, अशी जोरदार मागणी घाटंजी तालुक्यातील पालक व शिक्षणप्रेमी नागरिकांकडून केली जात आहे.

"जिल्हा परिषद शाळा वाचवा – ग्रामीण शिक्षणाचा पाया भक्कम करा!"

## स्वत: च्या खाजगी वाहनावर लाल रंगात पोलीस पाटी लावली तर खबरदार -अपर पोलीस महासंचालक

**दैनिक युवक आधार मुंबई**
**किशोर गुडेकर, विभागीय संपादक**

मुंबई- स्वतः च्या खाजगी वाहनावर पोलीस नावाची लाल पाटी लाऊन फिरणाऱ्या पोलीस अधिकारी, अंमलदार तसेच सेवानिवृत्त अधिकाऱ्यांवर कार्यवाही करण्याचे आदेश डॉ. सुनील भारद्वाज पोलीस अधीक्षक अपर पोलीस महासंचालक (वाहतुक) मुंबई यांनी दिले. या पुढे पोलीस असी पाटी लावणाऱ्यांना पोलीस पाटी काढावी लागणार. राज्यातील बरेचसे पोलीस अधिकारी, अंमलदार, तसेच सेवानिवृत्त पोलीस अधिकारी आपल्या खाजगी वाहनावर पोलीस असी लाल रंगाची पाटी अथवा पोलीस लाल अक्षरात लिहून त्यांचे खासगी वाहन वापरत असतात. यामुळे पोलीस दलाची प्रतिमा मलीन होत आहे. या वर उच्च न्यायालयाने नाराजी व्यक्त केली असून या बाबत कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत. पोलीस पाटी असल्याने ते वाहन चेक होत नाही, पार्किंग लागत नाही, टोल लागत नाही. तसेच हे वाहन चेक होत नसल्याने कोणतेही अवैध काम होतात. गैर प्रकारही होतात. पण असा वाहनावर निर्बंध घालून पोलीस नावाची पाटी लावणाऱ्या चालकाविरुद्ध कार्यवाही करण्यास गंभीरतेने दखल घेतली जात नव्हती. म्हणुन माहिती अधिकार व पत्रकार संरक्षण समितीचे महाराष्ट्र राज्य कार्याध्यक्ष तथा जेष्ठ पत्रकार सखाराम कुलकर्णी यांनी दि.२७ जुलैला राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना तक्रारीचे निवेदन देऊन पोलीस नाव लिहिण्यास निर्बंध घालण्याची विनंती केली. या निवेदनाची दखल घेऊन अपर पोलीस महासंचालक (वाहतुक) मुंबई कार्यालयाने दखल घेऊन डॉ. सुनील भारद्वाज पोलीस अधीक्षक यांनी दिन.३१ जुलैला कार्यवाही करण्याचे आदेश राज्यातील सर्व पोलीस अधीक्षक, महामार्ग अधीक्षक व सर्व पोलीस आयुक्त यांना दिले. पोलीस पाटी अथवा पोलीस नाव लिहिलेले वाहन आढळून आल्यास त्यांचे विरुद्ध कलम १३३( ६) महाराष्ट्र मोटार वाहन नियम १९८९ सह कलम १७७ मोटार वाहन कायदा १९८८ अन्वये उचित कार्यवाही करण्यात यावी असे आदेशात नमूद केले आहे. या आदेशामुळे आता तरी पोलीस पाटीवर निर्बंध येतील असी प्रतिक्रिया तक्रारदार सखाराम कुलकर्णी यांनी दिली.

## एरंडोलला महापूर ;दोन महिन्यांच्या प्रतीक्षेनंतर दमदार पाऊस

**विशेष : स्वप्निल पाटील ....एरंडोल,**

१ ऑगस्ट – दोन महिन्यांच्या प्रतीक्षेनंतर अखेर एरंडोल तालुक्यात दमदार पावसाने हजेरी लावली. अंजनी धरणाच्या पाणलोट क्षेत्रात १०५ मिमी पावसाची नोंद झाली. त्यामुळे धरणात पाण्याची आवक झपाट्याने वाढली आणि धरणातून विसर्ग करण्यात आला.

या विसर्गामुळे शहराजवळ अंजनी नदीला मध्यम स्वरूपाचा पूर आला. परिणामी शहरातील काही भाग पाण्याखाली गेले. गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या संतधार पावसामुळे एरंडोल शहरातील जनजीवन काही प्रमाणात विस्कळीत झाले आहे. विशेषतः फकिरवाडा परिसरात घराघरात पाणी शिरल्याने नागरिकांना मोठी



गैरसोय सहन करावी लागत आहे. काही सखल भागात नदीचे पाणी घरात शिरल्याने परिस्थिती अधिक गंभीर झाली होती.

या पार्श्वभूमीवर एरंडोल नगरपरिषद प्रशासनाने तातडीने उपाययोजना सुरू केल्या. *उपनगराध्यक्ष कृष्णा ओतारी यांनी स्वतः फकिरवाडा परिसरात घराघरात फिरून नागरिकांची अवस्था पाहिली आणि मदतकार्य सुरू केले*. त्यांनी पाणी बाहेर काढण्यासाठी आवश्यक व्यवस्था करण्याच्या सूचना दिल्या. तसेच प्रभावित नागरिकांना थेट भेटून प्रोत्साहन दिले.

नगरपरिषद प्रशासनाने पंपिंगद्वारे पाणी काढणे, नाले स्वच्छ करणे आणि प्रभावित भागात तात्काळ मदत पोहोचविण्यासाठी यंत्रणा सक्रिय केली आहे. नागरिकांनी या आपत्तीत प्रशासन आणि लोकप्रतिनिधींच्या सक्रिय भूमिकेचे कौतुक केले आहे.

पाऊस थांबल्यानंतरही पाणी निचरा होण्यास वेळ लागण्याची शक्यता असल्याने प्रशासन सतर्क राहून पुढील उपाययोजना करत आहे.

# राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांच्या हस्ते विद्यापीठात वृक्षारोपण केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची उपस्थिती

### हरित नागपूरच्या दिशेने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा १ हजार वृक्ष लागवडीचा संकल्प

**दैनिक युवक आधार वाडी**
**प्रतिनिधी राकेश यादव**

नागपूर, दि. १ : पर्यावरण संवर्धनाचा ठोस संदेश देत हरित नागपूरच्या उभारणीसाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने एक हजार वृक्ष लागवडीचा महत्त्वाकांक्षी उपक्रम हाती घेतला आहे. या उपक्रमाचा शुभारंभ आज राज्यपाल तथा विद्यापीठांचे कुलपती जिष्णू देव वर्मा यांच्या हस्ते वृक्षारोपण करून करण्यात आला. यावेळी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनीही वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनासाठी प्रत्येकाने पुढाकार घेण्याचे आवाहन केले.

अंबाझरी मार्गावरील विद्यापीठाच्या जमनालाल बजाज प्रशासकीय भवनाशेजारील खुल्या परिसरात आयोजित या कार्यक्रमात हरित, स्वच्छ आणि पर्यावरणपूरक नागपूर घडविण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला. वृक्ष लागवड मोहिमेअंतर्गत विद्यापीठ परिसरात विविध देशी प्रजातींच्या एक हजार वृक्षांची लागवड करण्यात येणार असून, भविष्यात हा परिसर जैवविविधतेने समृद्ध हरित पट्टा म्हणून विकसित करण्याचा विद्यापीठाचा मानस आहे.

या प्रसंगी शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर, महापौर नीता ठाकरे, आमदार मोहन मते, आमदार प्रवीण दटके, प्र-कुलगुरू डॉ. अखिलेश पेशवे, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, कुलसचिव डॉ. विजय खंडाळ, उपमहापौर लीलाताई हाथीबेड, महापालिकेच्या स्थायी समिती सभापती शिवानी दाणी, महापालिका पक्षनेते बाल्याभाऊ बोरकर, माजी महापौर दयाशंकर तिवारी यांच्यासह विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य, अधिसभा व विद्वत परिषदेचे सदस्य, विविध शैक्षणिक विभागांचे प्रमुख, शिक्षक, अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सामान्य प्रशासन विभागाचे सहाय्यक कुलसचिव गणेश कुमकुमवार, उद्यान अधीक्षक प्रवीण गोतमारे, विद्यापीठ अभियंता विनोद इलमे तसेच उद्यान, अभियंता व सामान्य प्रशासन विभागातील कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

पर्यावरण संरक्षण, हवामान बदलाच्या आव्हानांना उत्तर आणि भावी पिढ्यांसाठी अधिक हिरवागार परिसर निर्माण




करण्याच्या उद्देशाने विद्यापीठाने हाती घेतलेली ही एक हजार वृक्ष लागवडीची मोहीम हरित नागपूरच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल ठरणार आहे.

# प्रसूतीवेळी डॉक्टर गैरहजर; नवजात बालकाच्या मृत्यूप्रकरणी अलिबाग जिल्हा रुग्णालयातील डॉ. प्रियल शेंडे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल

### जे.जे. रुग्णालयाच्या तज्ज्ञ समितीच्या अहवालानंतर कारवाई; ड्युटीवर असतानाही गैरहजर राहिल्याचा ठपका; नवजात बालकाच्या मृत्यूप्रकरणी डॉक्टरांविरुद्ध कारवाई

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**

चार वर्षांपूर्वी अलिबाग जिल्हा रुग्णालयात घडलेल्या एका हृदयद्रावक घटनेत नवजात बालकाचा मृत्यू झाल्याप्रकरणी अखेर संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सर जे.जे. समूह रुग्णालय, मुंबई येथील पाच तज्ज्ञ डॉक्टरांच्या समितीच्या अहवालानंतर अलिबाग पोलीस ठाण्यात तत्कालीन ऑन-ड्युटी वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रियल रविंद्र शेंडे यांच्या विरोधात भारतीय दंड संहिता कलम 304-A अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला आहे.बेलोशी (ता. अलिबाग) येथील सुष्मिता रुपेश काटले या १४ मे २०२२ रोजी प्रसूतीसाठी अलिबाग जिल्हा रुग्णालयात दाखल झाल्या होत्या. फिर्यादीनुसार, पहाटे दाखल झाल्यानंतर दीर्घकाळ योग्य उपचार मिळाले नाहीत. प्रसूतीच्या वेदना तीव्र होत असताना वारंवार डॉक्टरांना बोलावण्याची विनंती करण्यात आली. मात्र, ऑन-ड्युटी असलेल्या डॉ. प्रियल शेंडे




या रुग्णालयात उपस्थित नसल्याचा आरोप करण्यात आला आहे.

फिर्यादीच्या म्हणण्यानुसार, प्रसूतीदरम्यान बाळाचे डोके बराच काळ अडकून राहिले होते. परिस्थिती गंभीर असूनही वेळेत सिझेरियन शस्त्रक्रिया करण्यात आली नाही. अखेर सकाळी नर्सिंग स्टाफने प्रसूती केली; मात्र नवजात बालकाचा मृत्यू झाल्याचे नंतर कुटुंबीयांना समजले. या घटनेनंतर अलिबाग पोलिसांनी अकस्मात मृत्यू नोंद क्र. 33/2022 अंतर्गत तपास सुरू केला होता.

तपासादरम्यान वैद्यकीय कागदपत्रे सर जे.जे. रुग्णालयातील तज्ज्ञ समितीकडे पाठविण्यात आली होती. दि. २७ जुलै २०२६ रोजी प्राप्त झालेल्या समितीच्या अहवालात प्रसूतीच्या अत्यंत महत्त्वाच्या टप्प्यावर ड्युटीवरील डॉक्टर उपस्थित राहणे आवश्यक असताना त्या अनुपस्थित राहिल्याचे नमूद करण्यात आल्याची माहिती समोर आली. आवश्यक वैद्यकीय उपचार वेळेत न मिळाल्यामुळे नवजात बालकाचा मृत्यू झाल्याचे निरीक्षण अहवालात नोंदविण्यात आल्याने पोलिसांनी गुन्हा दाखल करण्याची कारवाई केली.

पीडित माता सुष्मिता काटले यांनी भावना व्यक्त करताना सांगितले की, "डॉ. प्रियल शेंडे यांच्या निष्काळजीपणा आणि हलगर्जीपणामुळे माझे बाळ माझ्यापासून कायमचे हिरावले गेले. माझ्या बाळाला परत आणणे शक्य नाही, परंतु या प्रकरणात न्याय मिळण्यासाठी मदत करणाऱ्या जे.जे. रुग्णालयातील तज्ज्ञ डॉक्टर, अलिबाग पोलिस अधिकारी आणि जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांचे मी आभार मानते. अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून दोषींवर कठोर कारवाई झाली पाहिजे."या प्रकरणावर प्रतिक्रिया देताना सामाजिक कार्यकर्ते अँड. राकेश नारायण पाटील म्हणाले की, "वैद्यकीय क्षेत्रातील निष्काळजीपणामुळे अनेक निष्पाप नवजात बालकांना जन्माआधीच किंवा जन्मानंतर जीव गमवावा लागत आहे. सर्वसामान्यांच्या मुलांच्या जीवाची किंमत आहे की नाही, हा प्रश्न आता उपस्थित होत आहे. सरकारने अशा प्रकरणांची गांभीर्याने दखल घेऊन जबाबदारांवर कठोर कारवाई करण्यासाठी अधिक प्रभावी यंत्रणा उभारण्याची गरज आहे."

या घटनेमुळे जिल्हा रुग्णालयांमधील वैद्यकीय सेवांची गुणवत्ता, डॉक्टरांची उपस्थिती, जबाबदारी आणि रुग्णांच्या सुरक्षिततेबाबत पुन्हा एकदा गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. न्यायालयीन प्रक्रियेत या प्रकरणातील सत्य समोर येईलच; मात्र एका आईच्या कुशीत येण्यापूर्वीच हरपलेल्या निष्पाप जीवासाठी न्याय मिळविण्याची अपेक्षा आता सर्वसामान्य नागरिक व्यक्त करत आहेत.

# गुन्हेगारीवर बसेल वचक; सीसीटीव्ही आणि लोकसहभागामुळेच गुन्हेगारांवर बसेल लगाम – ठाणेदार रामेश्वर चव्हाण

**दैनिक युवक आधार वाशीम**
**करण धोंगडे जिल्हा प्रतिनिधी**

रिसोड शहर आणि तालुक्यात कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी नागरिकांचा सक्रिय सहभाग आणि प्रत्येक महत्त्वाच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन रिसोड पोलीस स्टेशनचे कर्तव्यदक्ष ठाणेदार रामेश्वर चव्हाण यांनी केले. गुन्हेगारी रोखण्यासाठी पोलीस प्रशासन सातत्याने प्रयत्नशील असून नागरिकांनीही सुरक्षेच्या या मोहिमेत सहभागी होणे आवश्यक असल्याचे आवाहन त्यांनी केले.रिसोड पोलीस स्टेशन येथे ३१ जुलै रोजी आयोजित पोलीस–पत्रकार सुसंवाद कार्यक्रमात ठाणेदार रामेश्वर चव्हाण मार्गदर्शन करत होते. यावेळी पोलीस अधिकारी, कर्मचारी तसेच पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.




यावेळी ठाणेदार रामेश्वर चव्हाण यांनी सांगितले की, पोलीस यंत्रणा दिवस-रात्र नागरिकांच्या सुरक्षेसाठी कार्यरत असली तरी प्रत्येक घटना घडणाऱ्या ठिकाणी तत्काळ पोहोचणे प्रत्येक वेळी शक्य होत नाही. मात्र, संबंधित परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले असल्यास गुन्हेगारांची ओळख पटविणे, त्यांच्या हालचालींचा मागोवा घेणे, आरोपींना अल्पावधीत अटक करणे आणि गुन्ह्याचा जलद उलगडा करणे अधिक सोपे होते. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने आपल्या घरासमोर, दुकानात, व्यावसायिक आस्थापनात आणि सार्वजनिक ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यास प्राधान्य द्यावे,

"गुन्हेगारांनी सावध राहावे; कायदा मोडणाऱ्यांना कोणतीही सवलत दिली जाणार नाही. सीसीटीव्ही आणि जनतेच्या सहकार्याच्या बळावर प्रत्येक गुन्हेगारापर्यंत पोलीस पोहोचतील. नागरिकांनी निर्भयपणे माहिती द्यावी, त्यांची ओळख पूर्णपणे गोपनीय ठेवली जाईल."
**— ठाणेदार रामेश्वर चव्हाण**

असे त्यांनी स्पष्ट केले.ठाणेदार रामेश्वर चव्हाण यांनी भारतीय न्याय संहिता (बीएनएस) लागू झाल्यानंतर कायद्यात झालेल्या महत्त्वपूर्ण बदलांची माहितीही दिली. नवीन कायद्यांची माहिती प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचणे आवश्यक असून त्यासाठी पोलीस विभाग विविध जनजागृती उपक्रम राबवत असल्याचे त्यांनी सांगितले. सामाजिक संस्था, पत्रकार, युवक मंडळे आणि जागरूक नागरिकांनी या मोहिमेत सहभागी होऊन कायद्याविषयी जनजागृती वाढवावी, असे आवाहनही त्यांनी केले.

पोलीस आणि पत्रकार यांच्यातील समन्वय समाजहितासाठी अत्यंत महत्त्वाचा असल्याचे सांगत ठाणेदार रामेश्वर चव्हाण यांनी प्रसारमाध्यमांनी समाजात सकारात्मक संदेश पोहोचविण्याचे कार्य अधिक प्रभावीपणे करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. नागरिकांचा विश्वास, पत्रकारांचे सहकार्य आणि पोलीस प्रशासनाची तत्परता या त्रिसूत्रीच्या बळावर रिसोड तालुका अधिक सुरक्षित करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.कार्यक्रमात कायदा व सुव्यवस्था, अवैध धंद्यांवरील कारवाई, वाहतूक शिस्त, जनजागृती आणि नागरिकांच्या सहकार्याबाबत सकारात्मक चर्चा झाली. पोलीस प्रशासनाने नागरिकांच्या प्रत्येक तक्रारीला संवेदनशीलतेने प्रतिसाद देत सुरक्षित आणि गुन्हेमुक्त रिसोड घडविण्यासाठी कटिबद्ध असल्याचे ठाणेदार रामेश्वर चव्हाण यांनी पुन्हा अधोरेखित केले.

## श्री छत्रपती विद्यालय व ज्युनियर कॉलेज वावोशी येथे गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी; पोलीस अधिकाऱ्यांकडून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**दैनिक .युवक आधार**
**खालापूर - संतोष शेवाळे**

श्री छत्रपती विद्यालय व ज्युनियर कॉलेज, वावोशी येथे गुरुवार, दिनांक ३० जुलै २०२६ रोजी गुरुपौर्णिमेचा कार्यक्रम अत्यंत उत्साही वातावरणात पार पडला. इयत्ता ११वी वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.




कार्यक्रमाची सुरुवात शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. या प्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य श्री. आर. डी. गावित उपस्थित होत. खालापूर पोलीस स्टेशनचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. यामध्ये पोलीस उपनिरीक्षक पूजा चव्हाण मॅडम, पोलीस हवालदार पंकज खंडागळे, पोलीस शिपाई आशा कांगे, पोलीस शिपाई रेणुका राठोड आणि आशिष पाटील यांची विशेष उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकामध्ये ज्युनियर कॉलेज इन्चार्ज श्री. प्रशांत शेळके यांनी भारतीय गुरु-शिष्य परंपरेचे महत्त्व सांगून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. इयत्ता ११वी वाणिज्य शाखेच्या विद्यार्थिनी - राशी मरागजे, अंकिता गंगोत्रे, अक्षरा सावंत, भावना खरात, इयत्ता ५ वी ते ७ वीच्या शुभांगी लोंढे, संकीर्णा पाटील, यज्ञासा कोकरे आणि तनुजा वर्मा यांनी आपल्या सुंदर भाषणांमधून गुरुंप्रती मनस्वी कृतज्ञता व्यक्त केली.

पोलीस हवालदार पंकज खंडागळे यांनी आजच्या डिजिटल युगात होणाऱ्या सायबर गुन्ह्यांविषयी सविस्तर माहिती देऊन इंटरनेट वापरताना काय काळजी घ्यावी, याबाबत मार्गदर्शन केले.

पोलीस उपनिरीक्षक पूजा चव्हाण मॅडम यांनी पोक्सो (POCSO) कायदा सायबर क्राईम, दामिनी पथक व आपत्कालीन परिस्थितीतील इमर्जन्सी हेल्पलाईन नंबर याबद्दल विद्यार्थ्यांना उपयुक्त माहिती दिली.

विद्यालयाचे प्राचार्य श्री. रणजीत गावित यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतातून विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाचे कौतुक केले व शिक्षकांचे मार्गदर्शन आयुष्यात किती महत्त्वाचे आहे, यावर प्रकाश टाकला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राशी मरागजे हिने केले, तर उपस्थितांचे आभार वंशिका मरागजे हिने मानले.

## रहिमाबाद-अन्वीजवळील खेळणा नदीचा पूल बनला 'मृत्यूचा सापळा'! कठडे गायब, लोखंडी गज उघडे; ३० वर्षांपासून डागडुजी नाही



**दैनिक युवक आधार छत्रपती संभाजीनगर**
**योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी**

सिल्लोड तालुक्यातील रहिमाबाद-अन्वी गावाला जोडणाऱ्या खेळणा नदीवरील पुलाची अत्यंत दुरवस्था झाली असून, पुलावर मोठे खड्डे पडल्याने व लोखंडी गज उघडे पडल्याने हा पूल वाहनधारकांसाठी धोक्याचा बनल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. तब्बल तीस वर्षांपूर्वी बांधलेल्या या पुलाकडे सार्वजनिक बांधकाम विभाग व संबंधित यंत्रणेचे दुर्लक्ष होत असल्यामुळे प्रवासी आणि वाहनधारकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

स्थानिक नागरिकांकडून मिळालेल्या माहितीनुसार, अन्वी ते रहिमाबाद आणि आसडी या गावांशी संपर्क साधून देणाऱ्या खेळणा नदीवरील या पुलाचे बांधकाम १९९६ मध्ये झाले होते. राज्याचे तत्कालीन सार्वजनिक बांधकाम मंत्री नितीन गडकरी आणि तत्कालीन आमदार स्व. किसनराव काळे यांच्या पुढाकाराने हा पूल उभा राहिला होता. मात्र, त्यानंतरच्या काळात या पुलाची पुरेशी डागडुजी किंवा दुरुस्ती झाली नसल्यामुळे आज हा पूल जीर्ण झाला असल्याची माहिती स्थानिकांनी दिली आहे.

**अपघाताचे गंभीर धोके**

संरक्षण भिंतीचा व कठड्यांचा अभाव: पुलाचे दोन्ही बाजूंचे कठडे तुटल्यामुळे पुलाला पुरेशी सुरक्षित भिंत उरलेली नाही, ज्यामुळे रात्रीच्या वेळी प्रवास करताना वाहनचालकांना नियंत्रण सुटून अपघात होण्याची भीती स्थानिकांकडून व्यक्त होत आहे.

•उघडे पडलेले लोखंडी गज: पुलाच्या पृष्ठभागावरील भाग झिजल्याने आतील लोखंडी गज बाहेर आल्याचे दिसून येते, ज्यामुळे वाहनांच्या टायरला धोका निर्माण होऊ शकतो, असे वाहनचालक सांगतात.

•दुचाकीस्वारांच्या सुरक्षेचा प्रश्न: पुलावरील खड्ड्यांमुळे दुचाकीस्वारांना कसरत करावी लागत असून, शाळकरी मुले, शेतकरी व नागरिकांना या मार्गावरून जाताना काळजी घ्यावी लागत आहे.

**•त्वरित दुरुस्तीची मागणी•**

रहिमाबाद, अन्वी व आसडी परिसरातील ग्रामस्थ, शेतकरी आणि विद्यार्थ्यांचे या मार्गावरून नियमित आवागमन सुरू असते. त्यामुळे संभाव्य अडचण किंवा धोका टळावा म्हणून सार्वजनिक बांधकाम विभागाने या पुलाची पाहणी करून योग्य ती दुरुस्ती लवकरात लवकर करावी, अशी मागणी परिसरातील वाहनधारक, शेतकरी व नागरिकांकडून केली जात आहे.

## साडेचार वर्षांतही रस्ता नाही; प्रभाग २, ७ व १२ मधील नागरिकांचा संताप

### हनुमान कट्टा ते नगरपंचायत सभागृह मार्ग खड्डेमय; निवडणुकीपूर्वी तरी काम पूर्ण होणार का?

**दैनिक युवक आधार देवणी तालुका प्रतिनिधी पांडुरंग कदम**

देवणी नगरपंचायतीमध्ये सत्ताधारी काँग्रेसचा कार्यकाळ संपण्यास अवघे काही महिने शिल्लक असताना प्रभाग क्रमांक २, ७ व १२ मधील हनुमान कट्टा–मुर्के यांच्या घरापासून नगरपंचायत सभागृह आणि काळू यांच्या घरापर्यंतचा महत्त्वाचा रस्ता आजही मोठमोठ्या खड्ड्यांनी भरलेला असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.या तिन्ही प्रभागांचे प्रतिनिधित्व सत्ताधारी काँग्रेसच्या नगरसेवकांकडे असूनही गेल्या साडेचार वर्षांत रस्त्याचे काम पूर्ण न झाल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. दररोज या मार्गावरून ये-जा करणाऱ्या नागरिकांना, विद्यार्थी, महिला आणि वाहनचालकांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे.नगरपंचायत निवडणूक अवघ्या काही महिन्यांवर येऊन ठेपली असताना विविध विकासकामांच्या घोषणा आणि स्वयंघोषित नगराध्यक्ष पदाकरता इच्छुक गुडघ्याला बाशिंग बांधून तयार असून देवणी शहरात राहत नसून कर्तव्य शून्य नगरसेवकाचा अनुभव नसणारे अशा व्यक्तीची जाहिरात बाजी सुरू असून, काँग्रेस भाजप ही पार्टी आमचीच खाजगी मालमत्ता असे समजणारे येणाऱ्या निवडणुकीत पार्टी बदलणारे दिसतील यांची जागा दाखवणे अभिप्रेत आहे . प्रत्यक्षात हा महत्त्वाचा रस्ता अद्यापही दुर्लक्षित असल्याची टीका नागरिकांकडून होत आहे.




## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतील 'मोतीबिंदूमुक्त विदर्भ' अभियानाला मोठी गती

**दैनिक युवक आधार नागपूर**
**सतीश कडू संपादक विभाग**

मुंबई/नागपूर, दि. १ : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची महत्वांकांक्षी 'मोतीबिंदूमुक्त विदर्भ' संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर आणि वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेड यांच्यात ₹५ कोटींचा सामंजस्य करार यासाठी करण्यात आला आहे. या निधीच्या माध्यमातून 'नमो नेत्र संजीवनी' कार्यक्रमाची विदर्भात प्रभावी अंमलबजावणी करण्यात येणार असून, मार्च २०२७ पर्यंत विदर्भातील ११ जिल्ह्यांमध्ये २५ हजार मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत. या उपक्रमांतर्गत सर्व शस्त्रक्रिया शासकीय वैद्यकीय महाविद्यालये आणि जिल्हा रुग्णालयांमध्ये अत्याधुनिक सुविधांच्या माध्यमातून करण्यात येणार आहेत. त्यामुळे ग्रामीण व दुर्गम भागातील हजारो नागरिकांना दर्जेदार व मोफत नेत्रोपचार उपलब्ध होणार असून, त्यांच्या दृष्टीचे संरक्षण करण्यास मोठी मदत होणार आहे,ख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली आणि विशेष पाठबळामुळेच आयजीजीएमसी, नागपूरला या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी ₹५ कोटींचा निधी उपलब्ध झाला आहे. या निधीमुळे संपूर्ण विदर्भात व्यापक स्तरावर मोतीबिंदू शस्त्रक्रिया राबविणे शक्य होणार असून, 'मोतीबिंदूमुक्त विदर्भ' हे स्वप्न साकार करण्याच्या दिशेने हा महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.या उपक्रमामुळे केवळ मोतीबिंदूमुळे दृष्टी गमावण्याचे प्रमाण कमी होणार नाही, तर समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांनाही दर्जेदार नेत्रोपचार सहज उपलब्ध होतील. सार्वजनिक आरोग्य क्षेत्रात शासन, वैद्यकीय संस्था आणि सार्वजनिक क्षेत्रातील उद्योग यांच्या समन्वयातून राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून स्वागत होत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य सरकार आरोग्यसेवा सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील असून, 'नमो नेत्र संजीवनी' कार्यक्रमाद्वारे विदर्भातील हजारो नागरिकांच्या जीवनात नवा प्रकाश निर्माण होणार असल्याचा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## उरण साई ट्रस्टच्या नगराज शेठसीबीएसई स्कूल उरण; मध्ये गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी**

उरण मधील नगराजशेठ सीबीएसई इंटरनॅशनल स्कूलमध्ये गुरुपौर्णिमाउत्सव सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सकाळी सुरेख रांगोळयांनी आणि फुला पानांच्या तोरणांनी स्कूलच्या प्रवेशव्दारावर विशेष सजावट करण्यात आली होती,सकाळी साईट्रस्ट चे अध्यक्ष गुरुवर्य नरसू पाटील सरांचे आगमन होताच टाळयांच्या कडकडाटात विद्यार्थ्यांनी पुष्पवृष्टी करून गुरूंचे स्वागत केले .यावेळी गुरुवर्य नरसू पाटील सर व स्कूलचे प्रशासकीय अधिकारी गुरुवर्य प्रदीप पाटील सरांचेस्वागत करून विद्यार्थ्यांनी त्यांचे चरणकमल धुऊन त्यांना आपल्या आसनावर स्थानपन्न केले.

त्यानंतर प्रथेप्रमाणे विद्यचे आराध्यदैवत श्री गणेश,श्री सरस्वतीमाता,व श्री साईबाबा यंच्यामूर्तीची विधीपूर्वक पूजा करून पुष्पहर अर्पण करून दीपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी स्कूलच्या प्रिन्सिपॉल ज्योती म्हात्रे मॅडम व विद्यार्थ्यांनी सुस्वर स्वरात गुरुवंदना गीत सदर केले.त्यानंतर अंकिता मॅडमनी




इंग्रजी मधून गुरुपौर्णिमे बाबत आजच्या दिवसाचे नेमके महत्व काय आहे हे विषद केले.पाठोपाठ विद्यार्थ्यांनी गुरुपौर्णिमी निमित्ताने गुरुपौर्णिमेची माहिती मराठी हिंदी व इंग्रजी भाषेमधून कथन केली,

दरम्यान कोल्हापूर येथे दीशा शिक्षण व विकासकेंद्रया संस्थेच्या नुकत्याच झालेल्याअध्यक्षपदाच्या निवडणुकीत गुरुवर्य नरसू पाटील सरयांची निवड बिनविरोध झाली त्याच बरोबर संस्थेच्या सेक्रेटरी पदावर ब्रम्हानंद नरसू पाटील यांची निवडहि बिनविरोध झालीअसल्याने तर साईसंस्थाच्या सदस्यपदावर सौ.सोनाली ब्रम्हानंद पाटील यांची निवड आणि खजिनदारपदी सौ.पद्मिनी नरसू पाटील यांची निवड झाल्याने गुरुपौर्णिचे औचित्यसाधत नगराजशेठ सीबीएसई इंटरनॅशनल स्कूलच्या वतीने त्यांचा विशेष सन्मान शाल पुष्पगुच्छ व सन्माचिन्ह देऊन करण्यात आला. यावेळी आली आई हि सर्वप्रथम आपली गुरु असून आज तुम्ही ज्या स्कूलमध्ये शिक्षण घेता ते तुमचे गुरु आहेत ज्या चौसष्ट कलाआणि चौसष्ट विद्येचाअधिपती श्री गणपती यांनी खऱ्या अर्थाने गुरुपूजनाचा शुभारंभ केला जे महाभारत आपण ऐकतो ते ज्या महर्षी व्यासमुनीनेरचलेआणि श्री गणेशाने लिहिलेत्यावेळी श्री गणेशानी महर्षी व्यासांचीपूजा करून लेखनाचा आरंभ केलातो दिवस आषाढ पौर्णिमेचा दिवस होता म्हणून त्याला व्यासपौर्णिमा असेही म्हणतात भगवान श्रीकृष्णाला गुरु होते त्यांचे नाव सांदिपनी.श्री रामालाही गुरु होतेत्याचे नाव वशिष्ठमुनी होते आज जिथे देवाला ही गुरु आहे तसे तुम्हा आम्हालाही गुरु आहे त्यांच्या मार्गदर्शना शिवाय आपण जीवनात यशस्वी होणार नाही तेव्हा गुरूंचा आदर आपण सर्वानीच केला पाहिजे आपण सारे येथे जमलो असलो तरी अपणा सर्वांचे गुरु प्रदीप पाटील सर आहेत त्यांच्या मार्गदर्शनाकाही आपण सर्वानीच प्रगतीकडे जाऊया गुरुपौर्णिमी निमित्ताने तुम्हा सर्वाना अनेक आशीर्वाद आणि भविष्यांतील वाटचाली साठी शुभेच्छा असे नारसु पाटील सरांनी शेवटी सांगितले .यावेळी कु.परिणीता हीला गुरुवर्य नरसू पाटील सरानी पुष्पगुच्छ देऊन तिला तिच्या भविष्याच्या पुढील वाटचाली साठी आशीर्वाद दिले शेवटी,शिल्पा पडवळ मॅडम व कल्याणी कदम मॅडम यांनी विद्यार्थ्यांना मध्ये गुरुपौर्णिमेची माहिती सांगितली आणि गुरु वंदना संदर्भात एका नृत्य नाटिकेचा अविष्कार विद्यार्थांनी सादर केला गुरुपौर्णिमेचा सोहळा सादर करण्या साठी स्कूलच्या प्रिन्सिपॉल ज्योती म्हात्रे मॅडमच्या मार्गदर्शनाखाली स्कूलचे शिक्षकवृंद व शिकेतरकर्मचारी आणि राहुल सर यांनी परिश्रम घेतले या सुंदर क्षणाचे सूत्रसंचलन अंकिता मॅडमयांनी केले.



# भीमनगरमध्ये पाणी मिळवण्यासाठी जीवाची बाजी; आमच्या वार्ड मधून निवडून आलेले सदस्य करता काय संतप्त महिलांचा सवाल ?

## दूषित पाण्यानंतर आता विजेच्या धक्क्या लागण्याची भीती;पाणी,रस्ते,पथदिवे आणि गटारांचे प्रश्न या कडे ग्रामपंचायतीचे दुर्लक्ष

**दैनिक युवक आधार**
**खालापूर - संतोष शेवाळे**

खालापूर तालुक्यातील वावोशी येथील भीमनगरमध्ये पिण्याच्या पाण्याचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत असून, वारंवार लेखी अर्ज, निवेदने आणि व्हॉट्सॲपद्वारे ग्रामसेवक व सरपंच यांना माहिती देऊनही बोरिंग परिसरातील धोकादायक परिस्थितीकडे कथित दुर्लक्ष झाल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. यामुळे भीमनगरमधील महिलांमध्ये तीव्र संतापाचे वातावरण निर्माण झाले असून, नागरिकांच्या जीविताची जबाबदारी कोण घेणार, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, पावसाळ्यापूर्वीच बोरिंग परिसरातील मोठा खड्डा बुजविणे, पाण्याच्या निचऱ्यासाठी मोरी बांधणे, संरक्षक कठडा उभारणे आणि पंपाच्या स्विचची केबिन सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करण्याची मागणी करण्यात आली



**पाण्यातून जाऊन मोटार चालू करताना महिला (संतोष शेवाळे )**

होती. याबाबत ग्रामपंचायतीकडे लेखी अर्ज देण्यात आला होता तसेच ग्रामसेवक व सरपंच यांना व्हॉट्सॲपद्वारेही माहिती पाठविण्यात आली होती. मात्र, त्यानंतरही कोणतीही कार्यवाही झाल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

सततच्या पावसामुळे पंपाच्या स्विचची केबिन पूर्णपणे पाण्यात बुडाल्याने सलग चार दिवस भीमनगरचा पिण्याच्या पाण्याचा पुरवठा ठप्प झाला होता. त्यानंतरही कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात आलेली नसल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. सध्या पाणीपुरवठा सुरू करण्यासाठी महिलांना स्वतःचा जीव धोक्यात घालून पाण्यात उतरून स्विच केबिनपर्यंत जावे लागत असल्याचे चित्र असून, विजेचा धक्का लागण्याची भीती नागरिकांमध्ये व्यक्त केली जात आहे. ग्रामस्थांनी असा आरोप केला की, मागील वर्षीही बोरिंगमध्ये पावसाचे पाणी शिरल्यामुळे पिण्याचे पाणी दूषित झाले होते. त्या घटनेनंतरही आवश्यक प्रतिबंधात्मक उपाय करण्यात आले नाहीत. त्यामुळे यंदाही त्याच समस्येची पुनरावृत्ती झाल्याने प्रशासनाच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. भीमनगरमधील महिलांनी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त करताना सांगितले की, "पाणीपुरवठा सुरू करण्यासाठी आम्हालाच पाण्यात उतरून स्विच चालू-बंद करावा लागतो. अशावेळी विजेचा शॉक लागून एखादी दुर्घटना घडली तर त्याला जबाबदार कोण?" असा सवाल त्यांनी उपस्थित केला. तसेच भीमनगरमधील पाणीपुरवठा, रस्ते, गटारे, सार्वजनिक पथदिवे आणि कमी दाबाचा वीजपुरवठा अशा इतर मूलभूत समस्यांकडेही ग्रामपंचायत प्रशासन आणि सरपंच दुर्लक्ष करत असल्याचा आरोप महिलांनी केला. दरम्यान, डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रवेशद्वारापासून संपूर्ण भीमनगर परिसरातील अनेक सार्वजनिक पथदिवे बंद असल्याने रात्री परिसर अंधारात बुडत आहे. त्यामुळे महिला, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक आणि कामगारांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत असून अपघात किंवा अनुचित घटना घडण्याची भीतीही व्यक्त केली जात आहे. या सर्व प्रश्नांवर तातडीने कायमस्वरूपी उपाययोजना न झाल्यास संबंधित प्रशासनाविरोधात लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा भीमनगर ग्रामस्थांनी दिला आहे.

"बोरिंग परिसरातील धोकादायक परिस्थितीची माहिती आम्ही महिला सरपंच अश्विनी शहासने यांना प्रत्यक्ष सांगितली होती. महिला असल्यामुळे त्या आमच्या अडचणी समजून घेतील आणि तातडीने पाहणी करतील, अशी अपेक्षा होती. मात्र त्या आजपर्यंत भीमनगरमध्ये आल्या नाहीत. त्यामुळे महिलांमध्ये तीव्र नाराजी आहे."

**- अरुणा मोरे (रहिवासी, भीमनगर)**

"पाणीपुरवठा सुरू करण्यासाठी आम्हाला कंबरभर पाण्यातून जोखीम पत्करून पंपाच्या स्विचपर्यंत जावे लागते. स्विच सुरू-बंद करताना विजेचा शॉक लागून एखादी दुर्घटना घडली, तर त्याची जबाबदारी कोण घेणार? प्रशासनाने आमच्या जीवाशी खेळ करू नये."

**अंजू मोरे (रहिवासी, भीमनगर)**

"भीमनगरमध्ये रात्री सार्वजनिक पथदिवे बंद असल्याने संपूर्ण परिसर अंधारात असतो. रस्त्यांवर मोठमोठे खड्डे पडले आहेत. विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रवेशद्वाराजवळही कचरा टाकला जातो. याबाबत अनेक वेळा तक्रारी करूनही ग्रामपंचायतीकडून कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने ग्रामस्थांमध्ये संताप वाढत आहे."

**- सोनाली मोरे (रहिवासी, भीमनगर)**

# पिंपळा येथे एकाच दिवशी दोन आनंदाचे क्षण! लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती व मुख्याध्यापकांचा वाढदिवस उत्साहात साजरा!

**दैनिक युवक आधार**
**वाशीम**
**करण धोंगडे जिल्हा प्रतिनिधी**

पिंपळा (मालेगाव) येथील जिल्हा परिषद प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळेत लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची जयंती अत्यंत उत्साहपूर्ण व प्रेरणादायी वातावरणात साजरी करण्यात आली. विशेष म्हणजे याच दिवशी शाळेचे मुख्याध्यापक गजानन नरवाडे सर यांचा वाढदिवस असल्याने शाळेत दुहेरी आनंदाचे वातावरण निर्माण झाले. विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि ग्रामस्थांच्या उपस्थितीत हा सोहळा उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर गजानन नरवाडे सर, दिनकर इंगळे





सर, शामराव शिंदे सर व गजानन इडोळे सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

आपल्या भाषणातून शिक्षकांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीचे महत्त्व, त्यांचा जन्म, त्यांचे संघर्षमय जीवन, समाजप्रबोधनासाठी केलेले कार्य, साहित्य क्षेत्रातील अमूल्य योगदान तसेच त्यांना 'लोकशाहीर' ही उपाधी का मिळाली याविषयी सविस्तर माहिती दिली. त्यांच्या विचारांचा आजच्या समाजात किती मोठा प्रभाव आहे, हेही विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले.

यावेळी शिक्षकांनी विद्यार्थ्यांना अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनातून प्रेरणा घेऊन शिक्षण, कष्ट, प्रामाणिकपणा आणि समाजसेवा या मूल्यांचा अंगीकार करण्याचे आवाहन केले.

"लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे जीवन हे संघर्ष, स्वाभिमान आणि समाजप्रबोधनाचे प्रेरणादायी उदाहरण आहे. विद्यार्थ्यांनी त्यांच्या विचारांचा वारसा जपत शिक्षणाच्या बळावर स्वतःचे आणि समाजाचे भविष्य घडवावे. आज माझा वाढदिवस आणि अण्णाभाऊ साठे जयंती एकाच दिवशी येणे हा माझ्यासाठी अविस्मरणीय योग असून विद्यार्थ्यांचे प्रेम आणि सहकाऱ्यांचे सहकार्य हीच माझ्यासाठी सर्वात मोठी भेट आहे."

**— गजानन नरवाडे**
**मुख्याध्यापक,जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,पिंपळा**

विद्यार्थ्यांनीही कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग घेत शिक्षकांचे मार्गदर्शन मनःपूर्वक ऐकले.

कार्यक्रमादरम्यान शाळेचे मुख्याध्यापक गजानन नरवाडे सर यांचा वाढदिवसही मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. शिक्षक, विद्यार्थी, शिक्षकेतर कर्मचारी तसेच ग्रामस्थांनी त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देत त्यांच्या कार्याचा गौरव केला.यावेळी आपल्या मनोगतात मुख्याध्यापक गजानन नरवाडे सर म्हणाले, "आज लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती आणि माझा वाढदिवस एकाच दिवशी येणे हा माझ्यासाठी भाग्याचा आणि अभिमानाचा क्षण आहे." त्यांनी वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देणाऱ्या सर्व शिक्षक, विद्यार्थी, ग्रामस्थ आणि उपस्थितांचे मनःपूर्वक आभार व्यक्त केले.

या कार्यक्रमास शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच गावातील संदीप वानखडे यांचीही प्रमुख उपस्थिती होती. संपूर्ण कार्यक्रम उत्साहपूर्ण आणि प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला.

# आगामी सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर दिग्रसमध्ये जातीय दंगा काबू योजनेची रंगीत तालीम




**दैनिक युवक आधार दिग्रस**
**प्रतिनिधी उमेश साखरकर**

आगामी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती तसेच विविध सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर दिग्रस शहरात शांतता, सुव्यवस्था व कायदा-सुव्यवस्था अबाधित राखण्याच्या दृष्टीने दिग्रस पोलीस स्टेशनच्या वतीने शुक्रवारी वाल्मीक चौक येथे जातीय दंगा काबू योजनेची रंगीत तालीम घेण्यात आली.

प्रभारी ठाणेदार यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या या रंगीत तालीमेद्वारे कोणत्याही आपत्कालीन किंवा संवेदनशील परिस्थितीला तातडीने आणि प्रभावीपणे कसे सामोरे जावे, याचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. पोलीस दलाने दंगल नियंत्रणासाठी आवश्यक असलेल्या विविध उपाययोजनांचे नियोजनबद्ध सादरीकरण करून सज्जतेची चाचणी घेतली.

सदर रंगीत तालीम दुपारी पार पडली. या तालीमेत दिग्रस पोलीस स्टेशनचे 3 पोलीस अधिकारी व 28 पोलीस कर्मचारी सहभागी झाले होते. तसेच कार्यकारी दंडाधिकारी तथा नायब तहसीलदार श्री. संदीप सोनकुसरे हे देखील उपस्थित होते. परिसरातील सुमारे 15 ते 20 नागरिकांनी या रंगीत तालीमेचे निरीक्षण केले.

यावेळी आगामी सण-उत्सव शांततेत व सौहार्दपूर्ण वातावरणात पार पाडण्यासाठी नागरिकांनी पोलीस प्रशासनाला सहकार्य करावे, अफवांवर विश्वास ठेवू नये तसेच कोणतीही संशयास्पद घटना अथवा माहिती तात्काळ पोलिसांना कळवावी, असे आवाहन करण्यात आले.

दिग्रस शहरात कायदा व सुव्यवस्था कायम राखण्यासाठी पोलीस प्रशासन पूर्णपणे सज्ज असून, अशा प्रकारच्या रंगीत तालीमेमुळे पोलीस यंत्रणेची कार्यक्षमता अधिक बळकट होत असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

# ऐरोलीत पालिकेच्या मोठ्या कारवाई दरम्यान स्थानिकरस्त्यावर. अनधिकृत बांधकाम कारवाईत अडथळा आणणाऱ्यांविरोधात FIR दाखल.

**दैनिक युवकआधार -**
**अमोल कांबळे (ऐरोली प्रतिनिधी)**

नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने ॲड.किशोर शेट्टी यांनी कोर्टात दाखल केलेल्या अवमान याचिका सीपी/६८५/२०२५ मध्ये अनधिकृत विनापरवानगी इमारतीची छायाचित्रे सादर केलेली आहेत. या छायाचित्रांमध्ये नमूद अनधिकृत इमारतींना व त्या व्यतिरिक्त इतर अनधिकृत बांधकाम सुरू असलेल्या इमारतींना ऐरोली विभाग कार्यालयामार्फत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 मधील कलम 54 अन्वये नोटीसा बजावण्यात आलेल्या होत्या. त्या अनुषंगाने संबंधितांनी सुरू असलेले अनधिकृत बांधकाम स्वतःहून हटवणे आवश्यक होते. परंतु त्यांनी अनधिकृत बांधकाम सुरू ठेवले होते. ते निदर्शनास आल्याने अशा इमारतींविरोधात ऐरोली विभाग कार्यालयामार्फत धडक मोहीम हाती घेण्यात आली आहे.

या मोहिमेअंतर्गत दिनांक 28



जुलै रोजी ऐरोली विभागातील 13 आणि 29 जुलै रोजी 6 बांधकाम सुरू असलेल्या इमारतींवर तोडक कारवाई करण्यात आली. यामधील सेक्टर 2 ऐरोली येथील घर क्रमांक 10, 11, 12, 13, प्रीती सोसायटी या इमारतीवर गुरुवार दि. 30 जुलै रोजी कारवाई सुरू असताना काही व्यक्तींनी या कारवाईमध्ये अडथळा आणण्याचा प्रयत्न केला. विभाग अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त श्रीम. साधना पाटील आणि महानगरपालिका अधिकारी, कर्मचारी कारवाई करण्यासाठी उपस्थित असताना शिवीगाळ करण्यात आली मारहाणीच्या हेतूने अंगावर धावून जात धक्काबुक्की करण्यात आली असल्याचे पालिकेच्या अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे.

तर पालिकेकडून भेदभाव केला जात आहे तसेच एका विशिष्ट लोकांच्या इमारतीनां टार्गेट केले जात असून अधिकारी पैसे घेत असल्याचा गंभीर आरोप रिपब्लिकन सेनेचे नवी मुंबई जिल्हा महासचिव दिपक पहूरकर यांनी केले आहेत. यावेळी दिपक पहूरकर व त्यांच्या सहकाऱ्यांनी पालिकेच्या विरोधात घोषणाबाजी व आंदोलन करून अधिकाऱ्यांवर दबाव आणण्याचा प्रयत्न केला असता शासकीय कामात अडथळा आणल्याबद्दल व अधिकाऱ्यांना शिवीगाळ करून धक्काबुक्की केल्याबद्दल त्यांच्या विरोधात दीपक पहुरकर, अक्षय मोरे, राजेश राठोड, विशाल टोणगे, सागर अलाकुटे, हर्षल बागुल, जावेद खान, संदीप शिंदे, संदीप मोहिते व इतर २० ते २५ जणांवर रबाळे पोलीस ठाणे या ठिकाणी FIR दाखल करण्यात आला असून अशा प्रकारे शासकीय कामात अडथळा आणणाऱ्या व्यक्तींविरोधात कठोर कारवाई केली जाणार असल्याचे समजते.

**कारवाई_केल्याने_इमारत_पडण्याची_शक्यता?**

दिनांक 28 जुलै रोजी ऐरोली विभागातील सेक्टर 2 ऐरोली येथील घर क्रमांक 10, 11, 12, 13, प्रीती सोसायटी येथील रो हाऊस वर तोडक कारवाई करण्यात आली. यावेळी सदर रोहाईस मध्ये अतिक्रमण झाले असून त्याचे जी + 3 चे बांधकाम सुरु होते. यावेळी पालिकेने जी+2 चे काही बांधकाम कारवाई दरम्यान पाडले. यावेळी कॉर्नर रोहाऊसचा महत्वाचा भीम (पिल्लर) व दोन्ही बाजूची भिंत तसेच स्लॅब पाडण्यात आला. त्यामुळे सदर इमारतीस कोणताही भक्कम आधार नसल्याने इमारत कधीही कोसळण्याची शक्यता येथील नागरिकांनी व्यक्त केली आहे.

## मृतदेहालाही गावात येता आले नाही; तरीही स्मशानभूमी आणि पुलाचा प्रश्न कायम – संगम चिंचोलीकरांचा जनप्रतिनिधींना संतप्त सवाल

**दैनिक युवक आधार उमरखेड**
**तालुका प्रतिनिधी राजू गायकवाड (मोहदरी)**

संगम चिंचोली गावातील स्मशानभूमी आणि नदीवरील पुलाचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. प्रतिष्ठित नागरिक सहशिक्षक प्रभाकर कुरतडे यांच्या निधनानंतर ओढ्याला आलेल्या पुरामुळे त्यांचे पार्थिव गावात आणणेही शक्य झाले नाही. अखेर मराठवाड्यातील उंचेगाव मार्गे शेतामध्ये अंत्यविधी करण्याची वेळ नातेवाईकांवर आली. या घटनेमुळे गावातील दशकानुदशके प्रलंबित असलेल्या मूलभूत प्रश्नांकडे पुन्हा लक्ष वेधले गेले आहे. गावकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, सत्तर वर्षांपासून स्मशानभूमीचा प्रश्न प्रलंबित आहे, तर कयाधू–पैनगंगा संगमावरील संगमेश्वर देवस्थान आणि नदीपलीकडील शेतांकडे जाण्यासाठी आजही कायमस्वरूपी पूल नाही. प्रत्येक पावसाळ्यात शेतकरी, विद्यार्थी, रुग्ण आणि नागरिकांना जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागतो.ग्रामस्थांचा सवाल आहे की, निवडणुकीत मतांसाठी गावात येणारे लोकप्रतिनिधी निवडून गेल्यानंतर या मूलभूत प्रश्नांकडे का फिरकत नाहीत? अनेक वर्षांपासून आश्वासने दिली जात आहेत; मात्र प्रत्यक्षात स्मशानभूमी आणि पुलाचे काम अद्यापही सुरू झालेले नाही.मुळावा जिल्हा परिषद सर्कलमधील ३२ गावांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या माजी आणि विद्यमान लोकप्रतिनिधींनी अनेक विकासकामांचा दावा केला; मात्र संगम चिंचोलीसारख्या गावातील अत्यावश्यक प्रश्न आजही सुटलेले नाहीत,, तर आज मृत व्यक्तीच्या अंत्यविधीसाठी पर्यायी मार्ग शोधण्याची वेळ आली नसती.सामाजिक कार्यकर्ते शुभम कळलावे यांचे मत «"प्रभाकर कुरतडे यांच्या पार्थिवालाही गावात आणता आले नाही, यापेक्षा मोठे प्रशासन आणि लोकप्रतिनिधींचे अपयश काय असू शकते? सात दशकांनंतरही संगम चिंचोलीला स्मशानभूमी आणि पूल मिळत नसेल, तर विकासाच्या घोषणा केवळ कागदावरच राहिल्या आहेत, हा प्रश्न तातडीने मार्गी न लागल्यास ग्रामस्थ लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडतील."»

# टेंभुर्णी येथे लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांची जयंती थाटामाटात साजरी

**दैनिक युवक आधार**
**जाफराबाद टेंभुर्णी प्रतिनिधी**

:अनिल ससाने साहित्यरत्न लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांची जयंती टेंभुर्णी येथे उत्साहात व थाटामाटात साजरी करण्यात आली. यावेळी अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन करून मान्यवर व उपस्थितांनी अभिवादन केले.कार्यक्रमाला माजी जिल्हा परिषद सदस्य शालिकराव मस्के पाटील, लहू शस्त्र सेना संस्थापक अध्यक्ष श्री. संजय बाबा गायकवाड, लहू शस्त्र सेनेचे प्रदेशाध्यक्ष बंडूभाऊ डोईफोडे, ज्योतिबा कांबळे (JCO), सौ. भारती मधुकर गोफणे (सरपंच, भातोडी), श्री. अनिल ससाने



(उपसरपंच, पापळ) यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच ग्रामपंचायत सरपंच, उपसरपंच व सन्माननीय सदस्य यांची उपस्थिती होती. ऑगस्ट 'लेखन प्रेरणा दिन' म्हणून साजरा करण्याचा निर्णया वेळी मान्यवरांनी सांगितले की, महायुती सरकारने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त १ ऑगस्ट हा दिवस 'लेखन प्रेरणा दिन' म्हणून साजरा करण्याचा आदेश पारित केला आहे. अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या लेखणीच्या माध्यमातून समाजातील वंचित, कष्टकरी आणि उपेक्षित घटकांच्या प्रश्नांना प्रभावीपणे वाचा फोडली. त्यांच्या साहित्यिक व सामाजिक कार्यातून नव्या पिढीने प्रेरणा घ्यावी, असे आवाहन यावेळी करण्यात आले.।वेळी उपस्थित मान्यवरांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यिक, सामाजिक व शाहिरी कार्याचा गौरव करत त्यांच्या विचारांचा समाजाने आदर्श घ्यावा, असे आवाहन केले.।र्यक्रमाची प्रस्तावना राजू गोफणे सर यांनी केली, तर आभार प्रदर्शन मधुकर गोफणे सर यांनी केले. कार्यक्रमास नागरिक, युवक, सामाजिक कार्यकर्ते व समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सायबर फसवणुकीसाठी 'म्युल अकाउंट' पुरवणाऱ्या टोळीचा पर्दाफाश; सात जण गजाआड मुंबई सायबर पोलिसांची धडक कारवाई; १० लाखांची रोकड, १६ मोबाईल, २३ सिमकार्ड, २२ चेकबुकसह मोठा मुद्देमाल जप्त

**दैनिक युवक आधार**
**मुंबई | प्रतिनिधी**

सायबर फसवणुकीसाठी वापरली जाणारी 'म्युल अकाउंट' (Mule Account) उघडून देणाऱ्या टोळीचा मुंबईच्या मध्य विभाग सायबर पोलीस ठाण्याने पर्दाफाश करत सात आरोपींना अटक केली आहे. या कारवाईदरम्यान आरोपींकडून १० लाख रुपयांची रोकड, १६ मोबाईल फोन, ३१ विविध कंपन्यांचे शिक्के, २३ सिमकार्ड, २२ चेकबुक, सात बँक अकाउंट किट, कॅश काउंटिंग मशीन तसेच इतर महत्त्वाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

सायबर पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे २९ जुलै २०२६ रोजी इंडियन ओव्हरसीज बँकेच्या बोरिवली शाखेत सापळा रचण्यात आला. यावेळी सलमान हबीब पठाण हा १० लाख रुपयांची रक्कम काढण्यासाठी बँकेत आला असताना पोलिसांनी त्याच्यासह दोन साथीदारांना ताब्यात घेतले. त्यानंतर भायंदर आणि मिरारोड येथील कार्यालयांवर छापे टाकून आणखी चार जणांना अटक करण्यात आली.

पोलिसांच्या चौकशीत आरोपी सायबर गुन्हेगारांना बनावट कागदपत्रांच्या आधारे बँक खाती उघडून देत असल्याचे उघड झाले. या खात्यांचा वापर देशभरातील सायबर फसवणुकीतून मिळालेली रक्कम वळविण्यासाठी केला जात असल्याची धक्कादायक माहितीही समोर आली आहे.

अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये सलमान हबीब पठाण (३४), साजिद निशारअहमद कोठावाला (४६), चिराग केतन टोपराणी (३१), सय्यद वजाहत वाहिउद्दीन (४१), राकेश रामाशंकर मिश्रा (४२), रक्षित के. राजेंद्र हेगडे (३५) आणि आर्यन रितेश ठक्कर (१८) यांचा समावेश आहे.या प्रकरणी गुन्हा क्रमांक १०६/२०२६ दाखल करण्यात आला असून भारतीय न्याय संहिता तसेच माहिती तंत्रज्ञान कायद्यानुसार पुढील तपास सुरू आहे. प्राथमिक तपासात आरोपींशी संबंधित बँक खात्यांचा देशभरातील ८४ हून अधिक सायबर गुन्ह्यांमध्ये वापर झाल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यामुळे या प्रकरणाचे देशव्यापी सायबर गुन्हेगारी रॅकेटशी संबंध असल्याची शक्यता पोलिसांकडून तपासली जात आहे.

ही कारवाई मुंबई पोलीस आयुक्त देवेन भारती, सहपोलीस आयुक्त (गुन्हे) अनिल कुंभारे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) कृष्णकांत उपाध्याय, पोलीस उपायुक्त (सायबर) बजरंग बनसोडे आणि सहाय्यक पोलीस आयुक्त सुवर्णा शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक चिमाजी आढाव, पोलीस निरीक्षक रविकिरण डोरले तसेच मध्य विभाग सायबर पोलीस ठाण्याच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी या यशस्वी कारवाईत मोलाची भूमिका बजावली.

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची १०६ वी जयंती साकत ग्रामपंचायत कार्यालय येथे साजरी. "जग बदल घालुनी घाव, सांगून गेले मज भीमराव"

**दैनिक युवक आधार**
**जामखेड प्रतिनिधी**
**बापुसाहेब घोडेस्वार**

जामखेड - तालुक्यातील मौजे साकत ग्रामपंचायत कार्यालय येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची १०६ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. १ ऑगस्ट २०२६ रोजी लोकशाहीर, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची १०६ वी जयंती साजरी होत आहे. केवळ दीड दिवस शाळेत जाण्याची संधी मिळालेल्या या महान साहित्यिकाने आपल्या जिद्द, अनुभव आणि असामान्य प्रतिभेच्या जोरावर मराठी साहित्याला अमूल्य योगदान दिले. औपचारिक शिक्षण कमी असले तरी जीवनाचा मोठा अनुभव आणि वाचनाची आवड यामुळे त्यांनी साहित्यविश्वात



वेगळे स्थान निर्माण केले.

जिवनाचे चित्रण आपल्या साहित्यातून जगासमोर मांडनारे सामाजिक बांधिलकी माननारे आणि समाज परिवर्तनासाठी लेखणीचे शस्त्र हाती घेऊन उपेक्षितांच्या जगण्याचे बयान वास्तव अधोरेखित करनारे साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त औचित्य साधून सकाळी ठिक ९ वाजता पहिल्या प्रथम प्रतिमेचे दिपप्रज्वलन व पुष्पहार अर्पण सरपंच सौ. मनीषा सर्जेराव मुरूमकर, ग्रामविकास अधिकारी बी. एम शिंदे आदि.साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

यावेळी माजी सरपंच दिलीप घोलप, सदस्य नागराज वराट, गणेश मुरूमकर, कॉम्पुटर ऑपरेटर रामहरी वराट, रोजगार सेवक हरिभाऊ वराट, कर्मचारी सतीश लहाने, ज्ञानेश्वर पुलवळे, कोतवाल विठ्ठल पुलवळे, पत्रकार बापुसाहेब घोडेस्वार, गंगाराम पुलवळे, अशोक पुलवळे, ज्ञानदेव पुलवळे, लखन पुलवळे, कृष्णा पुलवळे, दामोदर घोलप, योगेश पुलवळे गावातील प्रतिष्ठित व्यक्ती तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.

**अण्णाभाऊ साठे यांच्या कादंबऱ्या**

फाकिरा, मरणसपेक्ष, तुकाराम, कसपटा, वसंतनगर, सती, भिकारी, बंडखोर, लाकूडतोड, माझी रशियन यात्रा..

अण्णाभाऊ साठे हे मराठी साहित्यातील एक महत्त्वाचे नाव आहे. ते एक कादंबरीकार, कथाकार, नाटककार, कवि आणि लोकशाहीर होते. त्यांनी ३५ कादंबऱ्या, १९ कथासंग्रह, १४ लोकनाट्य, ११ पोवाडे, एक प्रवासवर्णन आणि शेकडो लावण्या, गाणी लिहिली आहे.

## स्थानिक रोष: प्रशासनाचे अधिकारी प्रत्यक्ष मदतीला व पंचनाम्यासाठी फिरकत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप

**दैनिक .युवक आधार**
**आर्णी तालुका प्रतिनिधी**
**-मुरली राठोड**

**आर्णी**: निसर्गाचा प्रकोप आणि मानवनिर्मित चुकांमुळे आर्णी तालुक्यात भीषण पूरस्थिती निर्माण झाली असून, याचा सर्वाधिक फटका बळीराजाला बसला आहे. तालुक्यातील हजारो हेक्टर शेती पाण्याखाली गेली असून शेकडो एकर सुपीक शेती पुराच्या पाण्यामुळे पूर्णपणे खरडून निघाली आहे.

रेतीच्या बेसुमार उत्खननामुळे वाढले संकट

उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये पैनगंगा, अरुणावती आणि अडाण या नद्यांच्या पात्रात मोठ्या प्रमाणावर बेसुमार रेतीचे उत्खनन करण्यात आले होते. यामुळे नद्यांचे मूळ पात्र आणि प्रवाहमार्ग पूर्णपणे अस्तव्यस्त झाले आहेत. परिणामी, नद्यांना आलेल्या पुराचे पाणी थेट शेतात शिरले असून, साकुर, मुकिंदपूर, साकुर कभठा, बाजार, राणीधानोरा, दातोडी, थड, गुदा आदी गावालगतच्या परिसरातील शेतीचे अतोनात नुकसान झाले आहे. बापूबींचं दुबार-तिबार पेरणीच्या संकटातून शेतकरी कसेबसे सावरत असतानाच या अस्मानी व सुलतानी संकटाने त्यांच्यासमोर आर्थिक डोंगर उभा केला आहे.

**आर्णी शहरातही बिकट अवस्था**

फक्त ग्रामीण भागातच नव्हे, तर आर्णी शहरातही नाल्यालगतच्या घरांमध्ये आणि दुकानांमध्ये पूरपाणी शिरल्यामुळे नागरिकांचे हाल झाले आहेत. आर्णी नगर परिषदेची यंत्रणा पूर्णपणे निष्क्रीम ठरल्याचा आरोप त्रस्त नागरिकांकडून होत आहे.

**प्रशासनाची अनास्था आणि नागरिकांचा संताप**

पूरग्रस्त शेतकरी आणि नागरिकांना धीर देण्यासाठी किंवा प्रत्यक्ष नुकसान पाहण्यासाठी प्रशासनाचे अधिकारी अद्यापही घटनास्थळी किंवा गावात पोहोचलेले नाहीत. केवळ व्हॉट्सअॅप किंवा फेसबुकवर संदेश फिरवून प्रशासन आपली जबाबदारी झटकत असल्याची भावना संतप्त नागरिकांनी व्यक्त केली आहे.

**तात्काळ मागणी:**

पूरग्रस्त भागाची तातडीने पाहणी करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तात्काळ आर्थिक मदत जाहीर करावी आणि युद्धपातळीवर पंचनामे सुरू करावेत, अशी आर्त हाक आर्णीतील शेतकरी देत आहेत.

# समर्थ महाविद्यालयात 'लेखन प्रेरणा दिवस' उत्साहात; 'आपले विद्यार्थी– आपले वक्ते' उपक्रमातून विद्यार्थ्यांनी उलगडला थोर विभूतींचा जीवनपट

**दैनिक युवक आधार**
**रोशन खोब्रागडे**

लाखनी: स्थानिक समर्थ महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना (NSS), सांस्कृतिक विभाग आणि राष्ट्रीय छात्र सेना (NCC) यांच्या संयुक्त विद्यमाने लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त 'लेखन प्रेरणा दिवस' उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त 'आपले विद्यार्थी – आपले वक्ते' या अभिनव उपक्रमांतर्गत वक्तृत्व




स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. धनंजय गभने होते. प्रमुख अतिथी म्हणून डॉ. बंडू चौधरी, प्रा. अशोक गायधनी आणि प्रा. एकता जाधव उपस्थित होते.

वक्तृत्व स्पर्धेत कु. लीना खेडकर, कु. समीक्षा चाचने, कु. समीक्षा फंदे, कु. शेजल सोनटक्के, गर्दीप सिंग गिल, कु. लकी बस आणि कु. जानवी जंजाळ यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत लोकमान्य टिळक व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनकार्य, विचार आणि समाजप्रबोधनातील योगदानावर प्रभावी भाषणे सादर केली.

अध्यक्षीय मार्गदर्शनात डॉ. धनंजय गभने यांनी विद्यार्थ्यांना ज्ञानार्जनाची सातत्यपूर्ण प्रेरणा देत, सजग नागरिक बनण्यासाठी वाचन, लेखन आणि प्रभावी अभिव्यक्तीचे महत्त्व अधोरेखित केले. विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रातील ज्ञान आत्मसात करून समाजाभिमुख दृष्टिकोन विकसित करावा, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक, राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेना विभागाचे स्वयंसेवक तसेच बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. रूपाली खेडेकर यांनी केले, तर प्रा. नंदकुमार सावरकर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# पनवेलच्या इतिहासात प्रथमच शासकीय स्तरावर लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती ; सभागृह नेते अँड. प्रकाश बिनेदार यांच्या संकल्पनेला यश

## "जयंती म्हणजे केवळ उत्सव नव्हे, तर महापुरुषांच्या विचारांचा जागर करण्याचा दिवस" – महापौर नितीन पाटील

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**

पनवेल महानगरपालिकेच्या इतिहासात प्रथमच लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती शासकीय स्तरावर अत्यंत दिमाखात साजरी करण्यात आली. आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात आयोजित या भव्य सोहळ्याची संकल्पना सभागृह नेते अँड. प्रकाश बिनेदार यांनी मांडली होती. त्यांच्या या प्रस्तावाला महापौर नितीन पाटील यांची तत्काळ मान्यता मिळाली, तर आमदार प्रशांत ठाकूर व माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी कार्यक्रमाचे नियोजन तातडीने ,सुंदर करण्याच्या सूचना प्रशासनाला दिल्यानंतर हा ऐतिहासिक उपक्रम साकार झाला.

कार्यक्रमात राष्ट्रीय स्तरावरील कलाकारांनी पोवाडे, शाहिरी, गीत आणि नाट्यमय सादरीकरणातून लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रेरणादायी जीवनप्रवासाचे प्रभावी चित्रण केले. त्यांच्या कार्याचा, साहित्याचा, संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील योगदानाचा, कामगार चळवळीतील सहभागाचा आणि सामाजिक परिवर्तनासाठी केलेल्या संघर्षाचा प्रभावी उलगडा करण्यात आला. कार्यक्रमादरम्यान शाहिरी गीतांच्या तालावर उपस्थित अनुयायी आणि रसिकांनी उत्स्फूर्तपणे नृत्य करत जल्लोष केला.




यावेळी बोलताना महापौर नितीन पाटील म्हणाले, "जयंती म्हणजे केवळ जन्मदिन साजरा करणे नव्हे, तर त्या महामानवांनी समाजाला दिलेल्या विचारांचा जागर करण्याचा दिवस आहे." अण्णाभाऊ साठे यांनी अवघ्या दीड दिवसांच्या औपचारिक शिक्षणाच्या बळावर २७ भाषांमध्ये साहित्य निर्माण करून भारताचे नाव जागतिक स्तरावर उज्ज्वल केले. अशी व्यक्तिमत्त्वे निर्माण होत नसतात, तर नियती त्यांना समाजाच्या कल्याणासाठी घडवत असते, असे गौरवोद्गार त्यांनी काढले. तसेच ही जयंती तहयात दरवर्षी अधिक व्यापक स्वरूपात साजरी केली जाईल, अशी ग्वाहीही त्यांनी दिली.

सभागृह नेते अँड. प्रकाश बिनेदार यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, समाजाच्या उन्नतीसाठी आयुष्य वेचणाऱ्या लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांचा वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचणे ही काळाची गरज आहे. म्हणूनच पनवेल महानगरपालिकेच्या इतिहासात प्रथमच शासकीय स्तरावर त्यांची जयंती साजरी करण्याचा निर्णय आमदार प्रशांत ठाकूर, महापौर नितीन पाटील व आयुक्त तसेच माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला. या वर्षी प्रथमच आयोजित केलेल्या कार्यक्रमाची माहिती सर्वांपर्यंत पोहोचू शकली नाही, याबद्दल त्यांनी दिलगिरी व्यक्त केली. मात्र, पुढील काळात सर्व महामानवांच्या विचारांचा गौरव करणारे असे प्रेरणादायी कार्यक्रम अधिक व्यापक स्वरूपात आयोजित करून पनवेलच्या सांस्कृतिक इतिहासात नवी भर घालण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहकार्य करणाऱ्या सर्व मान्यवर, कलाकार, अधिकारी, समाजबांधव आणि उपस्थित श्रोत्यांचे त्यांनी आभार मानले.


यावेळी विविध समाजबांधवांनी आपल्या भावना व्यक्त करताना मातंग समाजाच्या विकासासाठी लोकप्रतिनिधी सकारात्मक भूमिका बजावत असल्याचे सांगितले. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या विकासाभिमुख नेतृत्वाचा उल्लेख करत महापौर नितीन पाटील यांच्या नेतृत्वाखाली पनवेल शहर योग्य दिशेने वाटचाल करत असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. तसेच अभ्यासू ,सभागृह नेते अँड. प्रकाश बिनेदार यांनी अनेक वर्षांची समाजाची भावना ओळखून अण्णाभाऊ साठे जयंती शासकीय स्तरावर साजरी करण्याचा घेतलेला पुढाकार ,समाजाभिमुख कार्य अविस्मरणीय ठरेल अशी भावना अनेकांनी व्यक्त केली.

कार्यक्रमास महापौर नितीन पाटील, सभागृह नेते अँड. प्रकाश बिनेदार, अतिरिक्त आयुक्त महेशकुमार मेघमाळे, नगरसेवक मनोज भुजबळ,नगरसेवक अजय बहिरा, नगरसेविका प्रिती जॉर्ज, उपायुक्त कैलास गावडे तसेच अनेक मान्यवर, अधिकारी, कलाकार आणि समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या निमित्ताने महानगरपालिकेच्या वतीने उपस्थित मान्यवर, कलाकार आणि समाजातील ज्येष्ठ व्यक्तींचा सत्कार करण्यात आला. तसेच सर्व उपस्थितांसाठी अल्पोपहाराचीही व्यवस्था करण्यात आली.

## प्रेमचंद हे केवळ साहित्यिक नव्हते, तर भारतीय समाजचेतनेचे सशक्त स्वर" :- प्रा.डॉ.गोविंद शिवशेट्टे





-------

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा(प्रतिनिधी)-**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड तसेच श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई यांच्याशी संलग्न विविध महाविद्यालयांच्या संयुक्त विद्यमाने हिंदी विभागाच्या वतीने आयोजित 'प्रेमचंद जयंती समारोह' हा ऑनलाइन सहयोगात्मक कार्यक्रम ३१ जुलै २०२६ रोजी Google Meet द्वारे उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री सिद्धेश्वर महाविद्यालय, माजलगावचे प्राचार्य प्रा.डॉ.मुकुंद देवर्षी होते. प्रमुख व्याख्याते म्हणून महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा येथील प्रा.डॉ.गोविंद शिवशेट्टे यांनी प्रेमचंद यांच्या साहित्याचा सामाजिक आशय, मानवी मूल्ये आणि वर्तमान काळातील त्यांच्या विचारांची प्रस्तुतता या वर सखोल मार्गदर्शन केले. या वेळी बोलताना प्रा. डॉ.गोविंद शिवशेट्टे म्हणाले, "प्रेमचंद हे केवळ साहित्यिक नव्हते, तर भारतीय सामाजिक जागृती चे आद्य लेखक होते. त्यांच्या साहित्याने शेतकरी, कामगार, स्त्रिया, दलित आणि समाजातील वंचित घटकांच्या जीवन संघर्षाला शब्द मिळाले. लेखनाचे खरे उद्दिष्ट केवळ मनोरंजन नसून सामाजिक न्याय, समानता, मानवी संवेदना आणि नैतिक मूल्यांची जपणूक करणे हे आहे. आजच्या बदलत्या सामाजिक परिस्थितीत प्रेमचंद यांचे साहित्य अधिकच समर्पक वाटते. साहित्य आणि शिक्षण समाजपरिवर्तनाचे प्रभावी माध्यम ठरावे, हा संदेश त्यांच्या साहित्यातून मिळतो. प्रेमचंद जयंतीनिमित्त त्यांच्या विचारांना आत्मसात करून साहित्याला सामाजिक जागृतीचे माध्यम बनविण्याचा संकल्प करणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल." कार्यक्रमास श्री.शिवाजीराव पंडित कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, शिवाजीनगर (गढी)चे प्राचार्य डॉ.विश्वास कदम, कला महाविद्यालय, बिडकीनचे प्राचार्य डॉ.नितीन आहेर, कला व विज्ञान महाविद्यालय, पाटोदाचे प्राचार्य डॉ.सदाशिव सरकटे, महिला कला महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगरचे प्राचार्य डॉ.रामकिशन दहिफळे, महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा येथील प्राचार्य डॉ.कर्मवीर कदम तसेच स्वा.सावरकर महाविद्यालय, बीड येथील प्राचार्य डॉ.सुहास मोराळे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.गंगाधर उषमवार तर प्रास्ताविक प्रा.युवराज मुलये, यांनी केले प्रमुख पाहुण्यांची ओळख प्रो.संतोषकुमार यशवंतकर यांनी करून दिली तर आभार प्रा.वंदन जाधव यांनी मानले. कार्यक्रमाचे संयोजन प्रा.संतोषकुमार यशवंतकर, प्रा.मुखत्यार शेख, प्रा. युवराज मुलये, प्रा.वंदन जाधव, प्रा. बालाजी गायकवाड, प्रा. मिर्झा अनीस बेग, डॉ.गंगाधर उषमवार, प्रा. हिरा पोटकुळे, प्रा. विठ्ठलसिंह घुनावत, प्रा.परमेश्वर काकडे, डॉ.मोहसीन शेख, डॉ.संतोष शिंदे, प्रा. पंडित शेंडगे, प्रा.साईनाथ दुगमवार, प्रा.दिनकर सुरडकर, डॉ.वर्षा खोपे आणि प्रा. राहुल वाघमारे यांनी केले. कार्यक्रमात विविध महाविद्यालयांतील प्राध्यापक, संशोधक आणि विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून प्रेमचंद यांच्या साहित्य व विचारांना अभिवादन केले.

# येवद्यात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात साजरी

## शासनाच्या कल्याणकारी योजनांची माहिती; 'लेखन प्रेरणा दिन' निर्णयाचा जागर

दैनिक युवक आधार दर्यापूर
ज्ञानेश्वर काळे तालुका प्रतिनिधी

येवदाअण्णाभाऊ साठे नगर, येवदा येथे लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. यावेळी अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. उपस्थितांनी त्यांच्या साहित्य, सामाजिक कार्य आणि परिवर्तनवादी विचारांना उजाळा देत त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेण्याचा संकल्प व्यक्त केला.

कार्यक्रमादरम्यान उपस्थित मातंग समाज बांधवांना महाराष्ट्र शासनामार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध कल्याणकारी योजनांची सविस्तर माहिती देण्यात आली. मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य शासन मातंग समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक विकासासाठी विविध योजना प्रभावीपणे राबवत असून समाजाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी शासन कटिबद्ध असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

यावेळी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा रशियातील मॉस्को येथे उभारण्यात आलेला पुतळा तसेच महाराष्ट्र शासनाने त्यांच्या जयंतीला "लेखन प्रेरणा दिन" म्हणून साजरा करण्याचा घेतलेला निर्णय याबाबतही समाजबांधवांना माहिती देण्यात आली. अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्य, संघर्ष आणि सामाजिक परिवर्तनाच्या विचारांचा वारसा जतन करण्याचे आवाहनही करण्यात आले.

याप्रसंगी भाजपा अनुसूचित जाती मोर्चा, मेळघाट जिल्हाध्यक्ष नकुल सोनटक्के यांनी मार्गदर्शन करताना महायुती सरकार मातंग समाजाला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विविध कल्याणकारी योजना प्रभावीपणे राबवत असल्याचे सांगितले. शासनाच्या







योजनांचा लाभ घेऊन समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाला मातंग समाजातील ज्येष्ठ नागरिक, युवक, महिला व समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. उत्साहपूर्ण वातावरणात जयंती साजरी करून लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या कार्याला अभिवादन करण्यात आले.

# छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर; शासनाच्या विविध सेवांचा लाभ एकाच छताखाली !!

दैनिक युवक आधार अकोला
दिलीप कराळे प्रतिनिधी :

नागरिकांच्या अडीअडचणी वेळेत सोडविण्यासाठी प्रशासन अधिकाधिक गतिमान करण्याचा शासनाचा सातत्यपूर्ण प्रयत्न आहे. त्यादृष्टीने अनेक लोकाभिमुख उपक्रम व्यापक प्रमाणावर विविध विभागांच्या माध्यमातून राबविण्यात येत आहेत. महसूल विभागातर्फे आयोजित महाराजस्व अभियान नागरिकांना आवश्यक सेवा गतीने व पारदर्शक पद्धतीने मिळण्यासाठी उपयुक्त ठरेल, असे प्रतिपादन राज्याचे कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड आकाश फुंडकर यांनी केले.

महसूल विभागातर्फे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराचा शुभारंभ पालकमंत्री ॲड. फुंडकर यांच्या हस्ते नियोजनभवन येथे झाला. त्यावेळी ते बोलत होते. आमदार रणधीर सावरकर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. खासदार अनुप धोत्रे, आमदार वसंत खंडेलवाल, महापौर शारदा खेडकर , उपमहापौर अमोल घोगे, मनपा स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. आरती कुलवाल, उपविभागीय अधिकारी डॉ.शरद जावळे, मनोज लोणारकर, तहसीलदार कुणाल झाल्टे, सुनील चव्हाण, समाज कल्याण उपायुक्त मारूती वाठ यांच्यासह विविध यंत्रणांचे अधिकारी उपस्थित होते.

पालकमंत्री ॲड. फुंडकर म्हणाले की, समाजातील सर्व घटकांना विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी शासनाने अनेक महत्त्वपूर्ण योजनांना चालना दिली आहे. या योजनांचा लाभ गरजूंपर्यंत पोहोचून त्यांना मिळवून द्यावा. महाराजस्व अभियानासारख्या उपक्रमाचा त्यादृष्टीने प्रभावी वापर करावा.

शिबिराच्या माध्यमातून गरजूंना विविध योजना व सेवांचा लाभ मिळवून द्यावा, असे निर्देश खासदार श्री. धोत्रे यांनी दिले. शेतकरी बांधवांसाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना जिल्ह्यात राबविण्यात येत आहे. पात्र शेतकरी बांधवांना त्याचा लाभ मिळवून द्यावा. जिल्ह्यातील अधिकाधिक् शेतकऱ्यांनी पीक विमा योजनेत सहभागी होण्याचे आवाहन आमदार श्री. सावरकर यांनी केले.

यावेळी विविध योजनेतील लाभार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात लाभ वितरण, प्रमाणपत्र वितरण करण्यात आले. महसूल विभागाशी संबंधित दैनंदिन कामाला वेग देण्यासाठी आणि नागरिकांची प्रलंबित कामे मार्गी लावण्यासाठी तालुकास्तरावर महसूल विभागाकडून छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियानाचे आयोजन करण्यात आले. या अभियानातंर्गत प्रलंबित फेरफार, सातबारा उताऱ्यातील दुरुस्ती, जात आणि रहिवासी प्रमाणपत्र, तसेच घरपट्टे वाटप अशा विविध सुविधा एकाच छताखाली पुरवण्यात येत आहेत.



# सिल्लोडमध्ये बसस्थानक ते उपविभागीय कार्यालयापर्यंत सिमेंट रस्ता लोकार्पण

## आमदार अब्दुल सत्तार यांच्या हस्ते विकासकामांचा सोहळा संपन्न

**दैनिक युवक आधार छत्रपती संभाजीनगर**
**योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी**

सिल्लोड शहराच्या विकासात आणखी एका महत्त्वपूर्ण पायाभूत सुविधेची भर पडत असून, आमदार अब्दुल सत्तार यांच्या पुढाकारातून तसेच सिल्लोड नगर परिषदेमार्फत नव्याने साकारण्यात आलेल्या बसस्थानक ते उपविभागीय अधिकारी कार्यालय या सिमेंट कॉंक्रीट रस्त्याचे लोकार्पण




आमदार अब्दुल सत्तार यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाले.

यावेळी बोलताना आमदार अब्दुल सत्तार म्हणाले की, "बसस्थानक ते उपविभागीय अधिकारी कार्यालयादरम्यान नागरिकांसाठी पूर्वी ये-जा करण्यासाठी केवळ एकाच मार्गाचा पर्याय उपलब्ध होता. नव्याने साकारण्यात आलेल्या या सिमेंट कॉंक्रीट रस्त्यामुळे आता बसस्थानक परिसर, शैक्षणिक संस्था आणि आसपासच्या भागातील विद्यार्थी, नागरिक तसेच शासकीय कार्यालयांमध्ये येणाऱ्या नागरिकांना पर्यायी आणि अधिक सोयीस्कर मार्ग उपलब्ध झाला आहे. त्यामुळे वाहतुकीवरील ताण कमी होण्यास मदत होईल आणि नागरिकांचा वेळ वाचेल." शहराच्या विकासाबरोबरच नागरिकांना दैनंदिन जीवनात अधिकाधिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी अशा दर्जेदार विकासकामांना प्राधान्य देण्यात येत असल्याचे त्यांनी नमूद केले.

या कार्यक्रमास उपविभागीय अधिकारी प्रवीण फुलारी, नगराध्यक्ष अब्दुल समीर अ. सत्तार, परिविक्षाधीन उपजिल्हाधिकारी तथा तहसीलदार अंकिता ताकभाते, तहसीलदार (सोयगाव) मनीषा मेने, गटविकासअधिकारी रत्नाकर पगार, मुख्याधिकारी कारभारी दिवेकर, शिवसेना तालुकाप्रमुख केशवराव तायडे, जिल्हा परिषद सदस्य देविदास पालोदकर, उपनगराध्यक्ष विठ्ठल सपकाळ, नगरसेवक आसिफ बागवान, शेख इम्रान (गुड्डू) तसेच नगर परिषदेचे पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लोकार्पण सोहळयानंतर मान्यवरांच्या हस्ते सदरील परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. विकासकामांसोबत पर्यावरण संवर्धनालाही तितकेच महत्त्व देत "हरित सिल्लोड" घडविण्याचा सुंदर संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

# एक योजना जाहीर करायची, दुसऱ्या योजनेचा निधी रोखायचा !! नमो शेतकरी सन्मान निधीचे दोन हप्ते थकले

**दैनिक युवक आधार**
**दिलीप कराळे अकोला प्रतिनिधी:**

राज्यातील महायुती सरकारच्या कारभारावर आता शेतकरी आणि विरोधकांकडून जोरदार टीका होत आहे. "नवीन एखाद्या योजनेची मोठ्या थाटामाटात घोषणा करायची आणि आधीपासून सुरू असलेल्या इतर योजनांचे हप्ते व निधी रोखून धरायचा," हेच सध्याच्या सत्ताधाऱ्यांचे मुख्य धोरण बनले असल्याची चर्चा शेतकरी वर्गात सुरू आहे.

गेल्याच महिन्यात सरकारने शेतकऱ्यांसाठी कर्जमाफीची मोठी घोषणा करत वाहवा मिळवण्याचा प्रयत्न केला. परंतु दुसरीकडे प्रत्यक्ष जमिनीवर मात्र चित्र भलतेच आहे. शेतकऱ्यांना वेळेवर आर्थिक मदत देणारी 'नमो शेतकरी महासन्मान निधी' या योजनेचे तब्बल दोन हप्ते अद्यापही शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झालेले नाहीत. त्यामुळे "एक हात देण्याचा दिखावा करायचा आणि दुसऱ्या हाताने हक्क काढून घ्यायचा," असाच प्रकार सुरू असल्याचा आरोप शेतकरी करत आहेत.

हप्त्यांची प्रतीक्षा आणि बँकांचे तगादे :

केंद्राच्या पंतप्रधान किसान सन्मान निधीच्या धर्तीवर राज्य सरकारने 'नमो शेतकरी योजना' सुरू केली होती. याद्वारे दरवर्षी ६,००० रुपये शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा केले जातात. मात्र, गेल्या काही महिन्यांपासून या योजनेचे २ हप्ते (एकूण ४,००० रुपये) रखडले आहेत. खरीप आणि रब्बी हंगामात खते, बियाणे आणि मजुरीसाठी या पैशांची तीव्र गरज असताना निधी न




मिळाल्याने शेतकरी चिंतेत आहेत.

त्यातच कर्जमाफीच्या केवळ घोषणा झाल्याने अजूनही शेतकऱ्याच्या खात्यात पैसे जमा झाली नाही त्यामुळे बँकांकडून नवीन कर्जे मिळणे सध्या कठीण झाले आहे आणि जुन्या कर्जां चे थकलेले जास्तीचे पैसे भरायचे कसे या विचारात शेतकरी आहे.

निवडणुका डोळ्यांसमोर ठेवून केवळ घोषणांचा सुकाळ?

विरोधकांनी या मुद्द्यावरून सरकारला धारेवर धरले आहे. "हे सरकार केवळ जाहिराती आणि घोषणांपुरते मर्यादित आहे. बजेटमध्ये नव्या योजनांची नावे छापायची, पण जुन्या योजनांचे पैसे रोखून ठेवायचे, अशी यांची काम करण्याची पद्धत आहे," अशी घणाघाती टीका विरोधी नेत्यांनी केली आहे.

सुरू हंगामात मिळणारा हप्ता थकल्यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे. आता तरी महायुती सरकार केवळ घोषणांवर न थांबता नमो निधीचे रखडलेले हप्ते त्वरित जमा करणार का, याकडे संपूर्ण शेतकरी वर्गाचे लक्ष लागले आहे.

# रहिमाबाद केंद्राचे मुख्याध्यापक शालिकराव राऊत ३७ वर्षांच्या यशस्वी सेवापूर्तीनंतर सेवानिवृत्त !

**दैनिक युवक आधार छत्रपती संभाजीनगर**
**योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी**

जि. प. के. प्रा. शा. रहिमाबाद ( ता. सिल्लोड ) येथील मुख्याध्यापक तथा केंद्रप्रमुख श्री शालिकराव तोताराम राऊत हे शिक्षण क्षेत्रातील प्रदीर्घ आणि प्रदीप्त ३७ वर्षांची सेवा पूर्ण करून गत शुक्रवार, दिनांक ३१ जुलै २०२६ रोजी शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झाले. यानिमित्त जि. प. के. प्रा. शा. रहिमाबाद येथे अत्यंत उत्साही आणि भावुक वातावरणात भव्य 'सेवापूर्ती गौरव सोहळा' संपन्न झाला.

या सोहळ्यास सिल्लोड पंचायत समितीचे आदरणीय गटशिक्षणाधिकारी, शिक्षण विस्तार अधिकारी, पंचायत समितीचे कर्मचारी, रहिमाबाद केंद्रातील सर्व सन्माननीय मुख्याध्यापक, शिक्षक बंधू-भगिनी, शालेय व्यवस्थापन समितीचे आजी-माजी अध्यक्ष व सर्व सदस्य, गावातील प्रतिष्ठित नागरिक व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच याप्रसंगी सेवानिवृत्त शिक्षण विस्तार अधिकारी, नवनियुक्त शिक्षण विस्तार अधिकारी, सर्व केंद्रप्रमुख आणि सरांचे सर्व स्नेहीजन आवर्जून उपस्थित राहून त्यांच्या पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमप्रसंगी उपस्थितांनी श्री. शालिकराव राऊत यांच्या सेवाकाळात शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात दिलेल्या उत्कृष्ट योगदानाबद्दल गौरव करत सत्कार केला. विशेषतः रहिमाबाद केंद्राच्या प्रभारी केंद्रप्रमुख व केंद्रीय मुख्याध्यापक पदाची जबाबदारी सांभाळताना त्यांनी केलेल्या उल्लेखनीय कार्याची उपस्थितांनी प्रशंसा केली.

आपल्या मनोगतात व आभाराच्या भाषणात श्री. शालिकराव राऊत भावनिक होत म्हणाले की, "माझ्या ३७




वर्षांच्या सेवाकाळात गटशिक्षणाधिकारी, शिक्षण विस्तार अधिकारी, मार्गदर्शक केंद्रप्रमुख व सर्व सहकारी यांनी वेळोवेळी दिलेले मोलाचे मार्गदर्शन आणि पाठबळ माझ्यासाठी अमूल्य आहे. शालेय व्यवस्थापन समिती व गावकऱ्यांनी नेहमीच शाळेच्या प्रगतीसाठी उत्तम सहकार्य केले. तुमच्याकडून मिळालेले प्रेम, जिव्हाळा आणि सहकार्य हीच माझ्या आयुष्यातील सर्वात मोठी कमाई आहे. काम करत असताना नकळत कोणाचे मन दुखावले गेले असल्यास दिलगिरी व्यक्त करतो. ही आठवणींची शिदोरी सोबत घेऊन मी यापुढील आयुष्याच्या टप्प्यावर आनंदाने पदार्पण करत आहे."

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी श्री. शालिकराव राऊत यांना उत्तम आरोग्य, उज्ज्वल भविष्य आणि सुख-समृद्धीमय भावी आयुष्यासाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

# दर्यापुरात सराफा दुकानावर सशस्त्र दरोडा; बंदुकीच्या धाकावर लाखोंचा ऐवज लंपास

दैनिक युवक आधार दर्यापूर
ज्ञानेश्वर काळे तालुका प्रतिनिधी

दर्यापूर शहरातील सराफा व्यावसायिकांना हादरवून सोडणारी धाडसी दरोड्याची घटना शुक्रवारी सायंकाळी घडली. शहरातील 'महारे ज्वेलर्स' या सराफा दुकानात घुसलेल्या तीन ते चार अज्ञात दरोडेखोरांनी बंदूक व चाकूचा धाक दाखवत कर्मचाऱ्यांसह उपस्थित ग्राहकांना धमकावले. त्यानंतर अवघ्या काही मिनिटांत सुमारे ५०० ग्रॅम सोन्याचे दागिने आणि १३ किलो चांदीचे दागिने व वस्तू लंपास करून आरोपी घटनास्थळावरून पसार झाले.

घटनेची माहिती मिळताच दर्यापूर पोलिसांसह वरिष्ठ अधिकारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. परिसराची नाकाबंदी करण्यात आली असून दुकानातील व परिसरातील सीसीटीव्ही फुटेज ताब्यात घेऊन त्याची तपासणी सुरू




करण्यात आली आहे. तसेच प्रत्यक्षदर्शींची चौकशी करून आरोपींचा माग काढण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

या धाडसी दरोड्यामुळे शहरातील व्यापारी वर्गात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून सराफा व्यावसायिकांनी सुरक्षाव्यवस्था अधिक मजबूत करण्याची मागणी केली आहे. चोरीस गेलेल्या ऐवजाची अचूक किंमत निश्चित करण्याचे काम सुरू असून आरोपींना लवकरात लवकर अटक करण्यासाठी पोलिसांनी विशेष पथके रवाना केली आहेत. या प्रकरणाचा सर्व बाजूंनी सखोल तपास सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

# मालेगाव येथे श्री १००८ आदिनाथ भगवान दिगंबर जैन मंदिरात अष्टान्हिका पर्व उत्साहात संपन्न



दैनिक युवक अधार मालेगाव
तालुका प्रतिनिधी प्रकाश भुरे

मालेगाव : येथील श्री १००८ आदिनाथ भगवान दिगंबर जैन मंदिरात अष्टान्हिका पर्व भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात आनंदाने संपन्न झाले. या धार्मिक पर्वानिमित्त मंदिर परिसरात सकाळपासूनच भाविकांची मोठी उपस्थिती पाहायला मिळाली. मालेगाव जैन महिला मंडळाच्या सानिध्यात अष्टान्हिका पर्वानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते अष्टान्हिका पर्व हे जैन धर्मातील अत्यंत पवित्र आणि महत्त्वपूर्ण पर्व मानले जाते. या पर्वाच्या काळात भगवान जिनेंद्र देवांची भक्तिभावाने पूजा-अर्चना, अभिषेक, शांतिधारा, जिनवाणी श्रवण, स्वाध्याय तसेच विविध धार्मिक उपक्रमांमध्ये भाविकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. मंदिरातील भक्तिमय वातावरणामुळे संपूर्ण परिसरात आध्यात्मिक आणि मंगलमय वातावरण निर्माण झाले होते

जैन महिला मंडळाच्या महिला सदस्यांनी धार्मिक कार्यक्रमांचे नियोजन व आयोजनात सक्रिय सहभाग घेतला. भक्तीभावाने करण्यात आलेल्या धार्मिक विधींमुळे भाविकांना आध्यात्मिक समाधान मिळाले. यावेळी महिला मंडळाच्या सानिध्यात भक्तिगीते, धार्मिक स्तवन आणि जिनेंद्र भगवान यांच्या चरणी भक्तिभावाने आराधना करण्यात आली अष्टान्हिका पर्वाच्या निमित्ताने आदिनाथ भगवानांच्या चरणी मंगलमय वातावरणात पूजा-अर्चना करून सर्वांच्या सुख, शांती, समृद्धी आणि आरोग्यासाठी मंगलकामना करण्यात आली. जैन समाजातील महिला, पुरुष, युवक तसेच बालकांनीही मोठ्या उत्साहाने या धार्मिक पर्वात सहभाग नोंदवून धर्मलाभ घेतला

या पर्वामुळे मालेगाव शहरातील जैन समाजामध्ये धार्मिक एकोपा संस्कार आणि अध्यात्मिक वातावरण अधिक दृढ झाले अशी भावना उपस्थित भाविकांनी व्यक्त केली. अष्टान्हिका पर्वाच्या यशस्वी आयोजनासाठी जैन महिला मंडळ तसेच मंदिराशी संबंधित सर्व श्रावक-श्राविकांनी परिश्रम घेतले

# नांदूर-मधमेश्वर धरणातून 49,382 क्यूसेस पाण्याचा विसर्ग; कादवा नदीला पूर, संगमेश्वर महादेव मंदिर पाण्याने वेढले

**रौळस –पिंपरी मार्ग बंद; नांदूर-मधमेश्वर पुलावरील वाहतूक ठप्प, निफाड शहरातील घराची भिंत कोसळून नुकसान**

दैनिक युवक आधार नाशिक
जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी

इगतपुरी, त्र्यंबकेश्वर आणि नाशिक परिसरात गेल्या महिनाभरापासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे गोदावरी, दारणा, कादवा, बाणगंगा आदी नद्यांना मोठा पूर आला आहे. परिणामी निफाड तालुक्यातील नांदूर-मधमेश्वर धरणातून तब्बल 49,382 क्यूसेस पाण्याचा विसर्ग जायकवाडी धरणाच्या दिशेने करण्यात आला आहे. या विसर्गामुळे गोदाकाठ परिसरातील अनेक गावांमध्ये सतर्कतेचा इशारा देण्यात आला असून नदीकाठच्या भागांवर पुराचा परिणाम जाणवत आहे.

कादवा नदीच्या पाणीपातळीत मोठी वाढ झाल्याने निफाड येथील ऐतिहासिक संगमेश्वर महादेव मंदिर चारही बाजूंनी पुराच्या पाण्याने वेढले गेले आहे. त्यामुळे मंदिराचा संपर्क पूर्णपणे तुटला असून भाविकांना मंदिरात जाणे अशक्य झाले आहे. नदीच्या रौद्ररूपामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

दरम्यान, निफाड शहरातील पक्षीमित्र दत्ता काका उगावकर यांच्या वाड्याची भिंत अतिवृष्टीमुळे कोसळली. या घटनेत



मोठे आर्थिक नुकसान झाले असून सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. गुरुवारी मध्यरात्रीपासून सुरू झालेल्या संततधार पावसामुळे तालुक्यातील नदी-नाले दुथडी भरून वाहत आहेत. अनेक ठिकाणी शेतीमध्ये पाणी साचल्याने पिकांचे नुकसान होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण असून प्रशासन परिस्थितीवर लक्ष ठेवून आहे.

कादवा नदीची पाणीपातळी वाढल्याने रावळस–पिंपरी मार्गावरील पूल वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे. तसेच नांदूर-मधमेश्वर येथील निफाड–सिन्नर मार्गावरील पूलही बंद ठेवण्यात आल्याने वाहतुकीवर मोठा परिणाम झाला. पर्यायी मार्गांचा वापर करण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे. प्रशासनाने नदीकाठच्या गावांतील नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले असून अनावश्यकपणे पूरग्रस्त भागात जाणे टाळावे, तसेच नदीपात्राजवळ गर्दी करू नये, असे आवाहन करण्यात आले आहे.

# चालकाच्या सतर्कतेमुळे एसटीचा अपघात टळला

## ट्रिपल सीट बाईकला वाचवताना बस ३-४ फूट खाली, जीवितहानी नाही.

दैनिक युवक आधार श्रीवर्धन
तालुका प्रतिनिधी -अनिकेत मोहित

म्हसळा तालुक्यात आज पहाटे एक मोठा अनर्थ थोडक्यात टळला. एसटी बस चालकाने दाखवलेल्या अद्वितीय सतर्कतेमुळे आणि समयसूचकतेमुळे संभाव्य भीषण अपघात टळला असून, भरधाव ट्रिपल सीट मोटारसायकलला वाचवताना बस रस्त्याच्या कडेला तब्बल ३ ते ४ फूट खाली घसरली. सुदैवाने बसमध्ये एकही प्रवासी नसल्याने कोणतीही जीवितहानी झाली नाही.

मिळालेल्या माहितीनुसार, खालची आडी येथून सकाळी ६ वाजता महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची बस नेहमीप्रमाणे मार्गस्थ झाली होती. बस मधल्या आडी परिसरात पोहोचताच समोरून तीन जणांना घेऊन एक मोटारसायकल अतिवेगाने येताना चालकाच्या निदर्शनास आली. ट्रिपल सीट आणि भरधाव वेगामुळे बाईकस्वाराचे वाहनावरील नियंत्रण सुटण्याची स्थिती निर्माण झाली होती.

क्षणात परिस्थितीचे गांभीर्य ओळखत एसटी




चालकाने मोठे प्रसंगावधान दाखवले. समोर होणारी थेट धडक टाळण्यासाठी त्यांनी बस डावीकडे घेत नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न केला. मात्र, रस्ता अत्यंत अरुंद असल्याने बसचे डाव्या बाजूचे दोन्ही टायर रस्त्याखाली गेले आणि बस ३ ते ४ फूट खाली उतरली.

चालकाच्या या धाडसी आणि चपळ निर्णयामुळे समोरून येणाऱ्या बाईकस्वारांचे प्राण वाचले. विशेष म्हणजे बसलाही कोणतेही मोठे नुकसान झाले नाही. स्थानिक नागरिकांनी चालकाच्या प्रसंगावधानाचे कौतुक केले असून, निष्काळजी वाहनचालकांमुळे सार्वजनिक वाहतुकीतील चालकांना किती मोठा धोका पत्करावा लागतो याची पुन्हा एकदा जाणीव झाली आहे.

दरम्यान, घटनेची माहिती मिळताच म्हसळा तालुक्याचे जिल्हा परिषद सदस्य अभिषेक विचारे यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी चालक आणि वाहकाची भेट घेऊन विचारपूस केली तसेच त्यांना मानसिक धीर दिला. रस्त्याखाली अडकलेली बस बाहेर काढण्यासाठी क्रेनची आवश्यकता होती. एसटी कर्मचाऱ्यांच्या अडचणीची जाणीव ठेवत अभिषेक विचारे यांनी स्वतः पुढाकार घेत क्रेनच्या खर्चासाठी आर्थिक मदत केली.

वेळेवर मिळालेल्या या मदतीमुळे चालक-वाहकांना मोठा दिलासा मिळाला असून त्यांनी अभिषेक विचारे यांचे मनापासून आभार मानले. या घटनेने एकीकडे एसटी चालकांचे कौशल्य आणि जबाबदारी अधोरेखित केली, तर दुसरीकडे ट्रिपल सीट आणि भरधाव वाहन चालविण्याच्या धोकादायक प्रवृत्तीवर प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. सार्वजनिक रस्त्यावरची एक क्षणाची निष्काळजीपणाही किती मोठा अपघात घडवू शकते, याची ही घटना गंभीर आठवण करून देणारी ठरली आहे.

### गुरुपौर्णिमेनिमित्त मुडाणा येथील निजधाम आश्रमात भक्तांची अलोट गर्दी; ह.भ.प. तानाजी बापू महाराजांच्या सहकार्याने भक्तीमय वातावरणात सोहळा संपन्न

दैनिक युवक आधार एम. डी. सुरोशे
महागाव (जि. यवतमाळ)

"जे जे आपणास ठावे, ते दुसऱ्यासी देदे, शहाणे करून सोडावे सकळ जन; तोचि गुरु खरा, आधी चरण तयाचे धरा," या समर्थ रामदास स्वामींच्या वचनाचा प्रत्यय देणारा गुरुभक्तीचा अद्वितीय सोहळा गुरुपौर्णिमेनिमित्त महागाव तालुक्यातील मुडाणा येथील निजधाम आश्रमात अत्यंत भक्तिमय वातावरणात पार पडला. पहाटेपासूनच पंचक्रोशीतील हजारो भाविकांनी आश्रमात दर्शनासाठी गर्दी केली. संपूर्ण आश्रम परिसर "जय गुरुदेव" च्या जयघोषाने दुमदुमून गेला.

यंदाच्या गुरुपौर्णिमा सोहळ्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले. ह.भ.प. तानाजी बापू महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूरच्या पायी वारीत हजारो वारकरी सहभागी झाले होते. त्या भक्तिमय वारीनंतर गुरुपौर्णिमेनिमित्त मुडाणा येथील निजधाम आश्रमात झालेल्या सोहळ्याने संपूर्ण परिसर आध्यात्मिक ऊर्जेने भारावून गेला.

यावेळी ह.भ.प. तानाजी बापू महाराज यांनी गुरूचे जीवनातील स्थान, सेवा, सदाचार, संस्कार, अध्यात्म आणि समाजहित या विषयांवर प्रभावी मार्गदर्शन केले. त्यांच्या प्रेरणादायी विचारांनी उपस्थित भाविकांना नवी दिशा मिळाली. अनेक भक्तांनी याच प्रसंगी तानाजी बापूंना आपले गुरू म्हणून स्वीकारत गुरूशिष्य परंपरेचा सन्मान केला.

गुरुपौर्णिमेनिमित्त सकाळी ११ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. या महाप्रसादासाठी सौ. सुरेखा बाजीराव खंदारे पाटील, सौ. प्रियंकाताई आबासाहेब येणकर आणि श्री. अनिल गुलाबराव डहाळे यांनी अन्नदाता म्हणून मोलाचे योगदान दिले. हजारो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेत आयोजकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

संपूर्ण कार्यक्रम शिस्तबद्ध आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. गुरुभक्ती, सेवा, समर्पण आणि समाजप्रबोधनाचा संदेश देणाऱ्या या सोहळ्यामुळे निजधाम आश्रम परिसर दिवसभर भक्तिरसात न्हाऊन निघाला. ह.भ.प. तानाजी बापू महाराज यांच्या सहकार्याने आणि भक्तांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे मुडाणा नगरी भक्तीमय वातावरणाने दुमदुमून गेली, अशी भावना उपस्थित भाविकांनी व्यक्त केली.



# तळा येथे नामदार नाना शंकरशेट पुण्यस्मरण सोहळा उत्साहात

## श्री लक्ष्मीनारायण मंदिर ट्रस्ट व दैवज्ञ ब्राह्मण समाज, तळे यांच्या वतीने केले होते आयोजन

दैनिक युवक आधार
तळा प्रतिनिधी

श्री लक्ष्मीनारायण मंदिर ट्रस्ट, दैवज्ञ ब्राह्मण समाज, तळे यांच्या वतीने मुंबईचे शिल्पकार नामदार नाना शंकरशेट यांच्या पुण्यस्मरण दिनानिमित्त विविध सामाजिक व शैक्षणिक उपक्रमांनी युक्त असा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या प्रारंभी नामदार नाना शंकरशेट यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. उपस्थित मान्यवरांनी नानांच्या समाजोपयोगी, शैक्षणिक व संस्कृतप्रेमी कार्याचा गौरवपूर्ण आढावा घेत त्यांना विनम्र अभिवादन केले. या कार्यक्रमाचे औचित्य साधून एसएससी बोर्ड परीक्षेत संस्कृत विषयात विशेष प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांना नामदार नाना शंकरशेट संस्कृत शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली. यामध्ये कु. निर्जला चेतन कीर्तने, कु. स्वरा प्रकाश गायकवाड आणि कु. तेजस्विनी सुशील तिवारी या विद्यार्थिनींना सन्मानचिन्ह, गौरवपत्र व रोख रक्कम देऊन गौरविण्यात आले.

याच वेळी दैवज्ञ ब्राह्मण समाजातील ज्येष्ठ समाजबांधव श्री गणेश विष्णू वेदक (गणेशभाऊ) यांच्या ९० व्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त त्यांचा शाल, श्रीफळ व भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आला. उपस्थितांनी त्यांना निरोगी, आनंदी व दीर्घायुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमात श्री किशोर वेदक, श्री नंदकुमार वेदक आणि श्री प्रकाश गायकवाड यांनी आपल्या मनोगतातून नामदार नाना शंकरशेट यांच्या महान कार्याचा परिचय करून दिला.

अध्यक्षीय समारोपात श्री सुहास वावेकर यांनी शिष्यवृत्तीप्राप्त विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत भविष्यातही अशाच प्रकारे यश संपादन करण्यासाठी शुभेच्छा दिल्या. तसेच गणेशभाऊ यांना उत्तम आरोग्य व दीर्घायुष्य लाभावे, अशी सदिच्छा व्यक्त केली. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन महिला मंडळाच्या सचिव सौ. मितल वावेकर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सचिव श्री हर्षद वेदक, खजिनदार श्री राजेश वेदक, तसेच समाजातील सर्व ज्येष्ठ-श्रेष्ठ समाजबांधव व महिला भगिनी यांनी मोलाचे सहकार्य केले. नामदार नाना शंकरशेट संस्कृत शिष्यवृत्तीच्या रोख रकमेचे सौजन्य श्री संजय वसंत वेदक यांचे लाभले, तर सन्मानचिन्ह व गौरवपत्राचे सौजन्य श्री कमळाकर वावेकर यांचे होते. याशिवाय तळे मराठी शाळेत नाना शंकरशेट पुण्यतिथीनिमित्त विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यासाठी पत्रकार श्री किशोर पितळे, तसेच विद्यार्थ्यांना पेन वाटपासाठी खजिनदार श्री राजेश वेदक यांचेही विशेष सहकार्य लाभले.

समाजातील शैक्षणिक परंपरेला बळ देणारा, गुणवंत विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणारा आणि ज्येष्ठांचा सन्मान करणारा हा कार्यक्रम अत्यंत उत्साहात व मंगलमय वातावरणात संपन्न झाला.